

# मालटेकडीवरून

प्रवीण अं. धुमाळे

# मालटेकडीवरून

# प्रवीण अं धुमाळे

ई साहित्य प्रतिष्ठान

मालटेकडीवरून ( ललित)

लेखक प्रवीण अं. धुमाळे
Email: **dpravinan@gmail.com**

दुरध्वनी क्रमांक 8148047778
9922857778

पत्ता - सर्वोदय काँलनी, अमरावती, 444606

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :१३ डिसेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मालटेकडी वरुन

- प्रवीण अं. धुमाळे

‘‘मालटेकडीवरुन’’ हा प्रवीण धुमाळे यांचा नवा ललित संग्रह. सहज विरंगुळा म्हणून किंवा वेळ घालवण्यासाठी मालटेकडीवर फिरावयास जाणे हा त्यांचा आवडता आणि नित्याचा उद्योग असला तरी वेळ घालवणे या एवढाच हेतूत गुरफटून न राहता या दरम्यान आपल्या भोवतालच्या स्थितीगतीचे चिंतन, मनन करुन काहीतरी नवीन शोधून त्याला शब्दबद्ध करणे हे त्यांच्यासाठी विषेश असते त्यांच्या साहित्य निर्मीतीचे हे खरे मूळ आहे, म्हणूनच मालटेकडी हा त्यांच्या जिव्हाळयाचा विषय बनून जातो.

अमरावतीत प्रवेश केला की, मालटेकडी तुम्हाला खुणावते, अनेक दंतकथा तिच्या विषयी प्रचलीत असल्या तरी सध्या हिंदू-मूस्लीम धर्मियांच्या एकतेचे ती प्रतिक आहे, आरोग्याविषयी सतर्क असणा-यांची ती काळजीवाहक आहे, तर तरुणांच्या -हूदयाची ती अनामिक हूरहूर आहे. मालटेकडी ही प्रत्येक वयोगटातल्यांना आपल्याकडे खेचते आपलेसे करते, लेखकाला सुद्धा तिने भुरळ पाडली आहे तो तिच्या प्रेमात आहे पण हीच मालटेकडी लेखकाला गरीबी आणि श्रीमंतीच्या सिमारेषा असणारी मध्यबिंदू वाटते. ‘‘मालटेकडीवर दक्षिणेकडे तोंड करुन बसलो बसलं तर श्रीमंतीच श्रीमंती दिसते आणि उत्तरेकडं तोंड करुन बसलं तर गरीबी दिसते’’ म्हणून लेखक मालटेकडी उत्तरेकडे तोंड करुन बसणं टाळतो कारण त्याला गरीबीचा तिटकारा आहे म्हणून नव्हे तर उत्तरेकडे सातपुडयापर्यंत असणारी शेती आणि त्यात राबणारा शेतकरी अपरिहार्यामुळे शेतक-याच्या होणा-या आत्महत्या लेखकाला अस्वस्थ करतात. जगाच्या पोशिंद्यानेच आत्महत्या करावी ही जाणीवचं लेखकाच्या अंतर्मनाला हेलावून टाकते.

मालटेकडीवर फिरायला येणा-यांविषयीही लेखकाला सतत कुतूहल वाटत असते या कुतूहलातूनच प्रेमाविषयीच्या दोन भिन्न परस्परविरोधी अनुभवाचे कथन लेखक करतो. एक साठी उलटलेंलं जोडपं ज्यांनी विरहात अख्खं आयुष्य जाळलेलं असतं तर दुसरं तरुण जोडपं ज्यांच्या प्रेमाची सुरुवात तर झालीय मात्र एकमेकांच्या परिस्थितीच्या अंदाजावर त्यांच भविष्य अभं राहतंय या व्यतिरिक्तही संजना आणि विजयचं संघर्षपूर्ण यशस्वी प्रेम आणि एका दांपत्याचं निरलस प्रेम अंतर्मुख करणारं आहे. लेखकाचे हे अनुभव उत्कंठावर्धक कथेचा प्रत्यय देतात पण त्याच बरोबर प्रेमातली हूरहूर, ताटातूट, जिद्द, संघर्ष याचाही परिचय करुन देतात.

लेखक वाचकाला एक व्यापक अनुभवविश्वाचा प्रत्यय सदर लेखसंग्रहातून देतो. यात जागतिकीकरणाचा संसर्ग होण्यापूर्वीचे भाबडे विश्व रेखाटताना चवण्णी म्हणजे चार आणे म्हणजेच, ‘‘पंचवीस पैसे मिळाले तर एक दिवस त्याला न्याहाळण्यात आणि या पैशात काय काय विकत घ्यावं या प्रश्नात निघून जायचा, जणू काही पंचवीस पैशात आपण जगातले सारे सुख विकत घ्यायला चाललोय’’ पंचवीस पैसे

सर्वस्व वाटणा-या बालमनोवृत्तीचा हा निरागसपणा अनुभवताना त्यातला ताजेपणा तर लेखक कायम ठेवतोच त्याचा उत्कट प्रत्यही देतो त्यामुळेच की काय एखादयाचा चवण्णी म्हणून हिणवणे लेखकाला योग्य वाटत नाही.

यात्रा आणि गणेशोत्सवातल्या गमती जमती कुठेतरी हरवून गेल्याची हूरहूर लेखकाच्या मनात तर आहेच मात्र वाचकालासुध्दा ही हूरहूर आधुनिकीकरण्याच्या विश्वात विचार करण्यास त्यांचे लिखाण भाग पाडते. त्याच बरोबर दिवाळी असो किंवा आणखी काही महत्त्वाचे सण श्रमिकांना आणि कष्टक-यांना मात्र दररोजचा दिवस सारखाच असतो याचा अनुभवही अस्वस्थ करुन जातो. थंडीतील बहीरमच्या यात्रेविषयी वाचताना तर प्रत्यक्ष ती यात्रा अनुभवत असल्याचा भास होतो.

प्रवीण धुमाळे यांनी अत्यंत आत्मनिष्ठेने हे गद्य लिहीले आहे आणि हे लिहीत असतांना त्यांची भाषा अत्यंत संयत आणि कलात्मक झाली आहे. सहजपणे ते म्हणून जातात की, ''क्षितीजावर सूर्य दिवसाचा हात धरुन प्रकाशाला बरोबर नेतांना दिसतो, पृथ्वीला तो तसाच सोडून जात नाही जाताना पृथ्वीवर केशरी आकाशी रंगाची उधळण करुन जातो'' किवा ''आज त्या मुलाच्या वडीलांच्या पायात मालटेकडी चढावी एवढंही बळ नसेल कदाचित, अपघातानंतर तो मालटेकडीवर गेलाही नसेल पण मालटेकडीने आणि मी त्याच्या प्रेमाचं बळ नक्कीच बघितलंय'' यासारखी भाषा आणि शब्द रचना मनाचा ठाव घेतात.

एक चांगला लेखक हा चांगला निरीक्षक असतो तो संवेदनशील अस्वस्थ मनोवृत्तीचा असतो, त्याची संवेदनक्षमता आणि अस्वस्थता त्याच्यातील लेखकाला मुखर होण्यास प्रवृत्त करत असते. प्रवीण धुमाळे हे चांगले लेखक आहेत, त्यांच्या मनाला बोचणारे, सलणारे अनुभव हे मनाला व्यापणारे आहेत, ते केवळ शब्दांची आरास मांडत बसत नाहीत तर दु:खितांची अभिव्यक्तीही करतात आणि दुसरीकडे साप निघालेल्या प्रसंगात बोली भाषेतून विनोदी शैलीही उत्तम प्रकारे मांडताना दिसतात, म्हणूनच ''मालटेकडीवरुन'' हा ललित संग्रह वाचताना वाचकांच्या मनात ''मालटेकडी'' एक उत्तुंग भरारी घेताना दिसते, अगदी लेखकाच्याच भाषेत सांगायचं झाल्यास, ''मालटेकडी एक टेकडी असली म्हणून काय झालं तीलाही उत्तुंग भरारी घ्यावीशी वाटते अगदी तिच्यावर घिरक्या घालणा-या पाखरांसारखी''.

''मालटेकडीवरुन'' या ललित संग्रहासाठी लेखकाचे खुप खुप अभिनंदन आणि त्यांच्या आगामी काळात येणा-या काव्य संग्रहासाठी खुप खुप शुभेच्छा !

- प्रा. अक्षय किशोर घोरपडे

जालना

प्रिय रसिक वाचक दोस्तहो आदाब, नमस्कार !



मी प्रवीण धुमाळे ''मालटेकडीवरुन'' या ललित संग्रहाचा लेखक, तसा मी अमरावतीचाच पण तुम्हाला मालटेकडीवर कधीही भेटू शकतो. मित्रहो आता तुम्हालाही प्रश्न पडला असेल ''मालटेकडीवरुन'' हा ललित संग्रह लिहीण्यामागचं नेमकं प्रयोजन काय? खरं सांगू, 'मला ही माहीत नाही मी हा ललित संग्रह का लिहीला ते.' पण एक नक्की सांगतो, मनात सलत असलेलं मनातच कधी ठेवायचं नसतं त्याचा गलका होऊ द्यावा मग तो हुंदका कागदावर शब्दरुपात मांडावा मग त्याची कवीता होऊ दे, लेख होऊ दे की आणखी कोणता नवा साहित्य प्रकार उदयास येऊ दे. ... मनात सलतंय ना मग ते लिहीलंच पाहिजे कोणाला काही ही टिका करु देत. जगात आलोय तर प्रत्येकाचं या जागाला काही तरी देणं लागतं, या जगाचं ऋण त्या देण्याने फेडावं. आपल्या अवती भवती दिसणा-या जगातील वस्तुंचा कोणी तरी आपल्यासाठी शोध लाऊन गेलेले आहे पण आपण स्वत: या जगाला, या समाजाला काय दिलं? याचं आत्मचिंतन करावं मग जगाचा निरोप घेताना या जगाला मोठं काही देण्यापेक्षा निदाण एखादी कविता, एखादा सुविचार तरी देऊन जावं जेणे करुन त्यापासून कोणी प्ररेणा घेऊन आपला मार्ग ठरवताना कोणाच्यातरी कामी पडेल.

एम. बी. बी. एस. करणारा डॉक्टर होतो, बी. ई. करणारा अभियंता होतो, एल. एल. बी. करणारा वकील होतो मग मराठी स्नातक घेऊन पास झालेला विद्यार्थी लेखक का होत नाही??? मी मराठी स्नातकाचा विद्यार्थी मग मी का लेखक, कवी, साहित्यीक होऊ शकत नाही...? आणि याच जाणीवेतून मी लिहता झालो.

माझा छंद म्हणाल तर मला छायाचित्र टिपायला फार आवडतं.... अहो म्हणजे फोटोग्रॉफी.... पण कधी कधी शब्द कागदांवर टिपून काही तरी गिरवत बसतो. पण साहित्याचा विद्यार्थी या नात्याने मनात धावणा-या गोष्टींचे विरेचन व्हावे म्हणून जे मनात येईल ते कागदांवर लिहून ठेवतो. लिहीलेलं वाचून फाडून फेकण्यापेक्षा मी ते संग्रही ठेवतो कारण ते 'माझं' आहे.

पक्षी जसा शेतक-यांना 'पेरते व्हा' म्हणून खुणावतो तसे शब्द मला खुणावतात 'लिहीता हो' आणि यातूनच पुढे कदाचीत माझे किमान दोन तीन कवीता संग्रह तरी रसिक वाचकांच्या हातात नक्कीच येतील.

प्रिय वाचकहो, आपणा सर्वांचे मनापासुन आभार आणि धन्यवाद ! सोबतच ई-साहित्य प्रतिष्ठानच्या संपूर्ण संघ, प्रा. अक्षय घोरपडे सर, तसेच मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मदत करणा-या प्रत्येकांचे आभार !

- प्रवीण अं. धुमाळे

अमरावती

dpravinan@gmail.com



# -अर्पण पत्रिका-

छत्रपती शिवराय

आणि

माझ्या अंबानगरीस

अर्पण...

**मा**लटेकडी ! जिणे उमरावतीचा इतिहास बघितला आणि अनुभवला, जिणे उमरावतीचं रुपांतर अमरावतीत होताना बघीतलं, जिला स्वत: इतिहासानेच नाव दिलं अशी टेकडी. तुम्ही कोणत्याही गावावरुन अमरावतीत प्रवेश करा, बसने नागपूरहून मुंबईला जा की, धुळयावरुन कोलकात्याला जा ही टेकडी कायम वनराईचा हिरवाकंच शालू पांघरुन तुमच्या स्वागतासाठी सज्ज असते. अमरावती बस स्थानकापासून अवघ्या हाकेच्या अंतरावर ही टेकडी निसर्गाचा हिरवागार शालू पांघरुन कायम सजलेली, तिचं लोभसवानं गोंडस रुप बघावं ते बस स्थानकापासूनच! कितीही लांबचा प्रवास करुन या आणि या टेकडीकडे बघा, क्षणभरासाठी का होईना प्रत्येकाला ही टेकडी क्षीण विसरायला भाग पाडते. अमरावतीच्या शेजारील जिल्हयातील लोकांना 'मालटेकडी' हे नाव माहीत नसेल तर नवलंच!

'मालटेकडी' हे नुसतं नाव किंवा दगड, माती आणि वृक्षांनी बनलेली टेकडी नसुन ती जगण्याचं आणि जगवण्याचं एक साधन आहे. मालटेकडी म्हणजे शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळयामुळे ''मला महाराष्ट्रीयन असल्याचा अभिमान आहे'' असं सांगणारं तर हजरतगौसपाक बाबाच्या दर्ग्यामुळे ते ईस्लाम धर्मीयांचही श्रद्धास्थान आहे. पावसाळयात या टेकडीवरुन शहराचं रुप हे या टेकडीवर असलेल्या हजरतगौसपाक बाबाला अर्पण केलेल्या हिरव्यागार चादरी सारखं विलोभनीय दिसतं तर टेकडी वरुन दिसणारी घरं बाबाच्या चादरी वरील तारकांच्या नक्षीकामासारखी सुबक, सुंदर आणि आखीव रेखीव भासतात. तर सकाळी पूर्वेला आणि सायंकाळी पश्चिमेला अमरावती शहर टेकडी वरील छत्रपती शिवरायांचा अश्वारुढ पुतळयामागे फडकत असलेल्या ध्वजा प्रमाणे भगवंमय होतं, अशी ही टेकडी हिरवा अन् भगवा यांना एकत्र बांधणारी.

तीन ऋतुंप्रमाणे सकाळी, दुपारी आणि सायंकाळी वेगवेगळी रुपं धारण करणारी ही टेकडी. या टेकडीवर वेगवेगळया वेळी येण्याचे लोकांचे प्रयोजनही वेगवेगळे असतात. भल्या पहाटे येथे येणा-यांसाठी ही टेकडी जगण्याचं साधन आहे, सकाळी सकाळी येथे येणा-यांचा हेतू सकाळच्या हवे प्रमाणे शुद्ध असतो, आपलं शरीर सुदृढ करणं हा त्यांचा हेतू ! खाली टेकडीवरच असलेल्या रनिंग ट्रॅक पासून तर वर दूरदर्शन केंद्राजवळ असलेल्या ओटयापर्यंत सगळे रामदेवबाबांचे आसनं करण्यात मग्न असतात, कोणी भिन्न भिन्न प्रकारे श्वास घेऊन सोडत असतात, काही धापा टाकत बसलेले असतात, काही उलटया पावलांनी चालतात, कोणी चित्र विचित्र आवाज काढत असतात, कोणी खाली डोके वर पाय करुन येणा-या जाणा-यांना न्याहाळत असतात. असं रमणीय चित्र सकाळी सकाळी मालटेकडीवर बघायला मिळतं. जस जसा दिवस तरुण होत जातो तस तशी ही टेकडी सुद्धा तरुण होत

जाते, ती स्वत:ला तरुणांच्या हवाली करते आणि बघता बघता ही टेकडी तरुणांना आपल्यात सामावून घेते, त्यांचा आधार बनते, त्यांच्या सुख दु:खाची, आणाभाकांची साक्षीदार बनते. दिवस टळून सायंकाळ होताच सगळयाच वयोगटातील लोक येथे जमतात आणि मग या टेकडीला रुप येतं ते एका कुटूंबाचं.

या टेकडीवर आहे एक दर्गा. येथे केवळ मुस्लीमच नाही तर हिंदू सुध्दा दुवा मागायला येतात. दर्ग्याच्याच अगदी जवळ आहे सातपुडया कडे बघणारा छत्रपती शिवरायांचा अश्वारुढ पुतळा आणि दर्ग्याच्या अगदी समोर आहे दूरदर्शन केंद्र. अशी आध्यात्मिक, ऐतिहासिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन बाळबणारी ही टेकडी.

कित्येक तरुणांना तिने अनुभव दिले, कित्येकांच्या अपेक्षांचा भंग झालेला तिने पचवला, कित्येकांची स्वप्नपूर्ती होताना तिने बघीतली, कित्येक तरुणांच्या सुख दु:खाची ती शाश्वत साक्षीदार बनली. कित्येक लोक येथिल दर्ग्यातून आपली मुराद पूर्ण करुन जातात, टेकडीवर पोलीस भर्तीचा सराव करणारे अनेक भावी पोलीस शिवरायांपासून देशसेवेची प्रेरणा घेऊन जातात म्हणूनच आधी म्हटल्या प्रमाणे ही टेकडी जगणं आणि जगवण्याचं साधनही आहे.

असं म्हणतात पूर्वी उमरावती ; अमरावती द्ध हे शहर परकोटाच्या आत पर्यंत होतं आणि ही टेकडी जंगलात होती. परकोटाच्या आतील लोक खूप श्रीमंत होते. धन्द्रव्यासाठी कोणीतरी आपल्यावर हल्ला करणार हे परकोटाच्या आत राहणा-या लोकांना कळलं आणि लोकांनी आपल्या घरापासून दूर जंगलात असलेल्या टेकडीवर आपली संपत्ती ; माल द्ध लपवून ठेवली. नंतर परकोटाच्या आत संपत्ती लुटण्याचा प्रयत्न झाला की नाही माहीत नाही पण या घटनेमुळं या टेकडीला स्वत:च नाव मात्र मिळालं. हा झाला इतिहास पण पुढे या टेकडीला एक दंत कथा येऊन मिळाली ती अशी ‘या टेकडीवर आजही ती संपत्ती आहे. जो कोणी सा-त्वीक, भला माणूस कणकेची अखंड पोळी तयार करुन या टेकडीला त्या पोळीने झाकेल त्याला ही संपत्ती मिळेल’ पण आमच्या सारख्या एखादया बिलंदराने असा प्रयत्न करु नये म्हणून या दंत कथेला आणखी एक उपदंत कथा जोडली, ‘एक गुराखी होता. तो रोज या टेकडीवर गुरे चारायला आणी, एक दिवस टेकडीवरच्या धनाची आणि पोळीची गोष्ट त्याला समजली. त्याने एक अखंड पोळी तयार केली, टेकडीला झाकणार तेवढयात त्याची सारी गुरे दगडं बनली.’ आजही या टेकडीवर मोठे काळे दगड आहेत पण गुराख्याच्या गुरांचा आणि या दगडांचा काही एक संबंध नाही, हे आता आम्हाला मोठं झाल्यावर कळलं.

मालटेकडीवरच्या दगडांबद्ल असंही म्हटल्या जातं की, ‘या टेकडीवर एक योगी पुरुष राहत होता. टेकडीवर अनेक गुराखी येऊन गुरं चारायचे पण कोणताच गुराखी त्या योगी पुरुषाला दुधाचा एक घोटही देत नसे. एकदा एक गुराखी टेकडीवर गुरं घेऊन आला, त्या योगी पुरुषाने गुराख्याला दुधाची मागणी केली असता गुराखी म्हणाला, ‘‘अहो बाबा या गाई म्हशी थोडी आहेत दूध द्यायायला, हे तर दगडं आहेत’’. योगी पुरुषाचा अपमान झाला म्हणून त्याने श्राप दिला ‘‘या तुझ्या म्हशी आता दगडाच्या होतील’’ आणि खरोखर म्हशी दगड बनून टेकडीवरच राहिल्या. भौगोलिकदृष्टया या आख्यायिकेला काहीच महत्त्व नाही मात्र ही दंत कथा तयार करणा-याला एक सलाम तर नक्कीच ठोकला पाहिजे.

तर अशी ही ‘मालटेकडी’. ही टेकडी ‘शिवटेकडी’ या नावानेही ओळखल्या जाते. शिवाजी महाराजांचे मावळे जसे सह्याद्रीच्या कुशीत मोठे झाले तसे आम्ही मित्र लहानपणी या मालटेकडीच्याच कुशीत खेळून मोठे झालो.



मालटेकडीवर मी अनेक सायंकाळी घालवल्या. सायंकाळी पश्चिमेकडे तोंड करुन बसलं, की क्षीतीजावर सूर्य दिवसाचा हात धरुन प्रकाशाला बरोबर नेताना दिसतो, पृथ्वीला तो तसाच सोडून जात नाही जाताना पृथ्वीवर केशरी, आकाशी रंगांची उधळण करुन जातो.

शिवाजी महाराज ज्या दिशेने अश्वारुढ झाले आहे त्या दिशेने तोंड करुन मी कधीच बसत नाही. शिवाजी महाराज याच दिशेने सातपुडा पर्वताकडे बघत आहेत. मालटेकडी वरुन उत्तरे कडे बघीतलं तर दुर अंतरावर अस्पष्ट सातपुडा दिसतो. वलगाव पासून तर सातपुडयाच्या पायथ्या पर्यंत मोठया प्रमाणत शेती केली जाते. थोडी निराशा आली तर हतबल होऊन आत्महत्या करणारा शेतकरी मला दिसतो, म्हणून मालटेकडीवर या दिशेकडे मी कधीच तोंड करुन बसत नाही. आत्महत्या करणा-या शेतक-यांना आत्महत्या करण्यापूर्वी आत्महत्येनंतर कुटूंबाची होणारी दानादान कळत नसेल काय? की आपण मेल्यावर का ही परिस्थती बदलणार आहे? आपण मेल्यावर आपल्या लक्ष्मीला भरल्या संसारातून सोडून गेल्यावर काय वाटेल? आपली राख सावडताना आपल्या मुलाला काय वाटेल? आपण मेल्यावर सरकार किंवा नातलग आपल्या कुटूंबाला किती मदत करतील? हे माहीत असतानाही शेतकरी आत्महत्या करुन काय साध्य करण्याचा प्रयत्न करतो? कळत नाही. मालटेकडीवर दक्षीणेकडे तोंड करुन बसलं तर श्रीमंतीच श्रीमंती दिसते आणि उत्तरेकडे तोंड केलं तर दिसते गरीबी! देवाने एकीकडे गर्भश्रीमंत वर्ग निर्माण केला तर दुसरीकडे गरीबीमुळे गर्भातच मुलाला मारावं की काय असा प्रश्न ही निर्माण केला. सृष्टी निर्माण करताना एवढी मोठी तफावत या निर्मीकाने निर्माण केली. सृष्टीचा निर्माता म्हणून सगळी पृथ्वी आबादी आबाद करण्याचीही जबाबदारी त्या निर्मीकाने स्वीकारायला हवी होती. कदाचीत त्या निर्मीकाला या बाबत प्रश्न विचारण्याची माझी हिम्मत होत नाही म्हणून मी उत्तरेकडे तोंड करुन बसण्याचे टाळतो.

अंगणात खुर्ची टाकून चहा पिण्याची माझी सवय. अंगणातून रोज एक जोडपं मालटेकडीवर फिरायला जायचं. आठ एक वर्षांचा मुलगा त्याच्या आंधळया वडिलांचा हात धरुन चालत होता, स्वतःच्या डोळयांनी तो त्याच्या वडिलांना रस्ता दाखवत होता.

अंगणात खुर्ची टाकून चहा पित बसण्याची माझी जुनी सवय. अन् हया घटनेचं मुळही तेवढच जूनं. नेहमीं अंगणात खुर्ची टाकून चहा प्यायला बसायचो त्यावेळी एक प्रेमी युगल घरासमोरुन जायचं. सुरुवातीच्या दिवसात माझं त्यांच्याकडे लक्ष गेलं नाही पण दर सायंकाळी त्यांच फिरायला जानं सवईचं झाल्यावर मात्र मी त्यांच्याकडे आता रोज बघायचो. त्यांच्या बोलण्या चालण्यातलं, वागण्यातलं प्रेम बघुन मनाला फार बरं वाटायचं. त्याचं तिच्याकडे आणि तिचं त्याच्याकडे बघनं यात सुद्धा एक भाषा होती. हे युगूल एखाद्या दिवशी माझ्या नजरेसमोरुन गेलं नाही तर मनाला फार हुरहुर वाटायची. त्यांच्या प्रेमाची काळजी त्यांना बघेपर्यंत मलाच लागुन जायची पण त्यांना दुस-या दिवशी हसत बोलत जाताना बघितलं की मनाला लागलेली हुरहुर दुर व्हायची. चहा पिताना जर ते दिसले नाही तर चहाचीही मजा येत नसे. त्यांना बघनं हे सारं जवळपास एक वर्षांपर्यंत चाललं पण गेल्या काही दिवसात हे प्रेमी युगल माझ्या नजरेत आलंच नाही, मला फार काळजी वाटायची, कधी वाटायचं जर दोघांपैकी कुणीही दिसलं की विचारावं, काय झालं म्हणून? अन् त्यांच्यात काही भिनसलं असेल तर त्यांना समजवावं. पूर्वी त्यांच्याशी मी कधी बोललो नव्हतो, ते माझे सगे सोयरेही नव्हते पण त्यांची, त्यांच्या प्रेमाची ओढ मला लागली होती. का माहित नाही पण त्यांच्यात अन् माझ्यात एखादं नातंच जुळलं होतं.

पंधरा एक दिवसांनी हे युगल माझ्या समोरुन गेलं, फरक एवढाच की ते आज पती पत्नी म्हणून जात होते. तिच्या गळयातील मंगळसूत्र बघुन मनाला फार बरं वाटलं. घरासमोरुन त्यांच जानं आता कमी झालं होतं. पुढच्याच एका वर्षात तिच्या कुशीत त्या दोघांच्या प्रेमाचं प्रतिक होतं. आजही त्यांच घरासमोरुन जाणं येणं सुरु होतं पण पूर्वी पेक्षा फार कमी.


काही दिवसांत फक्त ती अन् तिचं बाळ दोघेच जाताना दिसायचे. एवढसं बाळ त्याचे हाडंही मजबूत व्हायचे होते पण ती त्या मुलाला चालणं शिकवीत होती. माझ्या मनात शंकेच वादळ वाहू लागलं. त्यांचा घटस्फोट तर झाला नसेल, त्यांच्यात काही वाद तर निर्माण झाले नसतील? मनात शंकेची पाल चुकचुकू लागली. एकदा ती तिच्या छोट्या मुलाला चालणं शिकवीत असताना मी तिला थांबवून विचारलंच तर त्यांचा अपघात झाला, अपघातात त्यांचे डोळे गेल्यानं तो घरीच राहत असल्याचं तिने सांगीतलं.

त्यांच्या प्रेमाचं ते छोटसं गोंडस प्रतिक तिच्या कुशित दिसणं बंद झालं होतं. ती त्या बाळाला रस्त्यावरणं चालणं शिकवीत होती. प्रत्येक आई आपल्या बाळाला हात धरुन चालणं शिकवतच असते पण तिचं शिकवणं वेगळं का आहे हे आज कळलं. आपल्या मुलाला चालता यावं, त्याने स्वतःच्या पायावर उभं व्हावं

मूळात हा तिचा हेतू नव्हताच तर आपल्या प्रेमाला कुठलाच त्रास न होऊ देणे, आपल्या प्रेमाच्या प्रतिकाला आपल्या प्रेमाचा डोळा बनविणे हा तिचा हेतू.

ब-याच दिवसांनी तो मुलगा आज त्याच्या आंधळया वडिलांचा हात धरुन चालताना दिसला. तो मुलगा त्याच्या आई वडिलांच्या प्रेमाचा दुवा आणि आंधळया वडिलांचा डोळा बनला होता.

आज त्या मुलाच्या वडीलांच्या पायात मालटेकडी चढावी एवढंही बळ नसेल, कदाचीत अपघाता नंतर तो मालटेकडीवर गेलाही नसेल पण मालटेकडीने आणि मी त्यांच्या प्रेमाचं बळ नक्कीच बघीतलं आणि ओळखलं.



एका सायंकाळी मालटेकडीवरुन डुबत्या सूर्याला न्याहाळत होतो. क्षीतीजावरची रंगांची उधळण बघण्यात मग्न झालो होतो, अचानक माझ्या शेजारी एक जोडपं येऊन बसलं. तिच्या 'मी गेलेली', 'मी असं केलेलं', 'मी तसं केलेलं' अशा बोलण्यावरुन ती मुलगी मुंबई किंवा कोकण कन्या असावी आणि तो मुलगा प्रमाणशीर मराठीत बोलायचा पण मध्येच एखादा 'मले-तुले'चा बॉम्ब टाकायचा यावरुन हा मुलगा आपल्याच गावचा असल्याचं सिद्ध होत होतं. आज पहिल्यांदाच मराठी भाषेचा विद्यार्थी असल्याचा उपयोग झाला. तिच्या बोलण्याच्या लकबी वरुन मी बांधलेला अंदाज खरा निघाला ती कोकण कन्याच होती. दुस-यांचं बोलणं कधी ऐकू नये पण डोळयांप्रमाणे कान बंद करण्याची शारीरिक व्यवस्था नसल्याने त्यांच्यातील सगळं बोलणं ऐकलं, नव्हे तर ऐकू आलं होतं.

त्या दोघांचं एकमेकांवर खुप प्रेम होतं पण अडचण मात्र ही होती की, तो अमरावतीच्या एका तालुक्यात राहणारा होता, ती हाय प्रोफाईल जिन्स टी शर्ट वर फिरणारी मुंबईकर मुलगी होती. लग्नानंतर दोघांच पटेलही पण त्या मुलाच्या आई वडीलांशी तिचं पटेल काय? हा त्यांच्या चर्चा सत्राचा विषय होता. तो तिला वारंवार विचारायचा, 'तू अॅडजस्ट करुन घेशील ना?' मी मनातच म्हटलं,

''याच्या जमिणीत पिकतो कापुस

तिच्या जमीणीत हापूस

याच्या कडे सं+ त्याचा बगीचा,

तिच्या कडे काजू नारळाची बाग

हा काळी माती

ती लाल माती'

कशी जुळतील यांच्या ऋणानुबंधनांची नाती''

बरोबरच आहे म्हणा, काळया मातीत हापुस पिकणार तरी कसा? आणि लाल मातीत कापूस टिकणार तरी कसा? हा फुल पॅन्ट मनिलावाला आणि ती जिन्स टी शर्ट वर फिरणारी. एखादया कंपणीत जॉबसाठी तो मुलगा मुंबई पुण्याकडे राहत असेलही, तिकडं हे चालून जाईल पण यदाकदाचीत त्या मुलीवर मुलाच्या तालुक्याच्या ठिकाणी राहण्याची वेळ आली तर ती तिचं राहणीमान बदलवेल? चार दोन दिवसांसाठी तिचे सासू सासरे त्यांच्याकडे रहायला आले तर ती घेईल का ॲडजस्ट करुन?

त्यांच्या चर्चेवरुन एक समाधान वाटत होतं की, ते कुठलीही कृती करण्यापूर्वी भावी जिवणाचा प्रॅक्टीकली विचार करीत होते. पण मग माझ्याच मनाने मला प्रश्न केला, असंच असेल तर मग प्रेमा बिमात पडायचंच कशाला?

सायंकाळ कलंडून रात्र होत होती, मी टेकडी वरुन खाली उतरलो पण ते  दोघेही तिथेच बसून होते. त्या दिवसा नंतर त्या दोघांपैकी कोणीही परत मालटेकडीवर दिसलं नाही. त्यांनी अखेर लग्नाचा काय निर्णय घेतला असेल हे माझ्यासाठी आजही एक गुढंच आहे. मी मालटेकडीवरुन खाली उतरल्यावर त्यांनी लग्ना संबंधी काय निर्णय घेतला असेल हे एकतर त्या दोघांना माहीत नाही तर या ‘मालटेकडीला’ तरी नक्कीच.



सायंकाळी वेळ मिळाला की मी मस्त फ्रेश होऊन, चहा वगैरे घेऊन एकतर अंबादेवीला जाणे पसंद करतो नाही तर मालटेकडीवर तरी. मालटेकडी अगदी घराजवळ असल्याने माझे पाय ब-याचदा मालटेकडीकडे कुच करतात.

ती हिवाळयाची गुलाबी सायंकाळ, छानसा मंद वारा थंडीला शीतल प्रतिसाद घालत वाहत होता. पक्षांचा परतीचा प्रवास सुरु असताना त्यांची चाललेली चिवचिव, टेकडीवरील झाडा झुडपांचा हिरवागार रंग, सूर्याने क्षीतीजावर गर्द आकाशी आणि केसरी रंगांची काढलेली रांगोळी असं सारं चित्र मालटेकडीवर चढताना थेट मनाला भिडत होतं.

हिवाळयात जर्कीनच्या खिशात दोन्ही हात खुपसून हळूहळू चालायला मला फार आवडतं. टेकडीवर चढताना मला साठीतलं जोडपं बसलेलं दिसलं. टेकडीवर पोहचताच मी माझं आसण ग्रहण केलं. या टेकडीवर माझी बसण्याची जागा ठरलेली आहे, मी तिथेच बसतो आणि जर त्या जागेवर मी बसलो नाही तर मला टेकडीवर आल्यासारखं वाटतच नाही. मी ज्या जागेवर बसतो तेथे नेमकं आजच एक पंचविसीतलं जोडपं बसलं होतं म्हणून आज मी माझं आसण त्यांच्या सुपूर्द करुन दुस-या जागेवर बसलो तर त्या ठिकाणाहून मालटेकडीवर चढताना भेटलेलं ते साठीतील जोडपं दिसू लागलं. ते गप्पा मारीत होते पण ते नवरा बायको नक्कीच नव्हते, त्यांच्या बोलण्यावरुन ते जणू काही फार जुणे मित्र मैत्रीण आहेत असंच वाटत होतं. माझ्या एका बाजुला तरुण अविवाहीत जोडपं तर दुसरीकडे एक म्हातारं जोडपं होतं, मुंबईच्या मरीन ड्राईव्हप्रमाणे कितीही जोडपे मालटेकडीवर बसलेले असले तरी माझी नजर कोणत्याच जोडप्याकडे जात नाही पण आज का माहीत नाही, पण वारंवार माझी नजर त्या म्हाता-या जोडप्याकडंच जात होती या आधी असं कधीच झालं नव्हतं.

नाही म्हटलं तरी माझे डोळे त्या म्हाता-या जोडप्याकडे झेप घेत होते, त्यांच्या राहणीमानावरुन दोघेही सेवानिवृत्त वाटत होते. पूर्वी या दोघांनाही मी कधी पाहीलं नव्हतं, कदाचीत ते दोघं नवरा बायको नसावे. ब-याच वेळचा म्हातारा गप्पच होता पाच दहा मिनीटांनी म्हातारी त्याकडे बघून काही तरी बोलायची तरी तो

गप्पच, एकटक दूर पश्चिमेकडे डुबत्या सूर्याकडे बघत होता. ती म्हातारी त्याच्याकडे बघुन खुप बोलली पण तो म्हातारा एकच वाक्य बोलला आणि दोघेही टेकडीच्या खाली उतरले.

रात्र होत होती, थंडीही आता सैतानासारखी झोंबत होती म्हणून मी ही खाली उतरलो. चालताना माझ्या डोक्यात विचारांच चाक फिरु लागलं. बहुतेक त्यांना आज त्यांच्या सहवासातला भुतकाळ तर आठवला नसेल ना!...

''ये किती रे असा गप्प गप्प राहतोस तू, मला नाही आवडत तुझं असं वागणं, मी आल्यावर हसणं आणि गेल्यावर एकटं एकटं बसणं. मी खुपदा पाहिलंय तुला त्या ताडाच्या झाडामागुन लपून, मी सोबत नसताना एकटा अन् शांत बसलेला. मी समजू शकते आपल्या जीवणात आलेल्या वादळाला. आलेलं प्रत्येक वादळ कधी ना कधी शांत होतंच ना, मग हे ही होईलच, मग तोपर्यंत काय असाच बसुन राहणार आहेस?

तुला आठवतात का ते समुद्राकाठचे दिवस? त्या पडक्या बाकावरुन आपण उशीरापर्यंत सूर्यास्त पहायचो. काय सुंदर दिसायचा ना तो मावळणारा सूर्य त्या नारळांच्या झाडामागून, समुद्रालाही जायचा मग आपला रंग देऊन, मग तू वेडा त्या सूर्याला बघून अस्वस्थ होऊन बासायचास आणि मलाही अस्वस्थ करायचास. मग मलाच तुझी समजुत काढावी लागायची. सूर्य गेला आता सावलीही जाणार म्हणून तुझं अस्वस्थ होनं हे तर मला सरावाचंच झालं होतं. किती हडवा होता तू नुसता रात्रभराच्या विरहाच्या अंतराने कासावीस व्हायचास आणि मला तरी करमत असेल काय रे तुझ्या विणा, तुला बघितल्या विणा, नाही रे ! या सूर्यामुळे मला ना आज ती माळराणावरची गोष्ट आठवली, तुला पण आठवते का रे ती गोष्ट अजूनही.! आपण कॉलेजला असताना मित्रांसोबत सहलीला गेलो होतो ती, कुणी तरी म्हटलं तुला, 'त्या डोंगरावरुन सूर्यास्त फार छान दिसतो'. मग तू घेऊन गेलास मला त्या डोंगरावर सूर्यास्त बघायला. ये पण खरंच ना काय मस्त सूर्यास्त दिसायचाना त्या डोंगरावरुन! सूर्यास्तानंतर आपण दोघेही तसेच बसलो त्या न दिसणा-या सूर्याला बघत आणि त्याला साक्षी ठेऊन येणा-या उद्याची स्वप्ने रंगवत ! डोंगरावरुन खाली उतरताना काय धांदल उडाली होती म्हणून सांगू दोघांचीही, तुझ्या आधारानेच तो डोंगर मी उतरु शकले.

एक दिवस तर तू कमालच केलीस. तुटलेला पतंग पाहून बसलास स्वत:ला हरवून. पण असं किती दिवस चालायचं भूतकाळ आठवत खिन्न होऊन बसणं. कुठे गेलं तुझं ते सोनचाफ्याला फुलताना बघुन होणारं स्मित? कुठे गेला नाचरा पाडस बघतांना तुला होणारा आनंद? कुठे ठेवलीस थुई थुई नाचणा-या मोराला पाहून होणारी प्रसन्नता? कुठे ठेवलास फुलांवर बागळणा-या फुलपाखराला पाहताच होणारा हर्ष? कुठे अन् का हरवलंस तू स्वत:ला? किती वेळ असाच बसणार आहेस तू मुका मुका? किती वेळची नुसती मिच बोलतीये? तुला नाही बोलायचं का आज?'' ती एवढं सारं बोलल्यावर, ''जाऊ दे गं, दिवस कसे निघून गेलेत ना आपल्या आयुष्यातले, अगदी मुठीत धरलेल्या वाळू सारखे'' त्याने फक्त अखेरचं एकच वाक्य तर म्हटलं नसेल ना?

मी बस स्टॅंडकडे असलेल्या गेटमधून बाहेर आलो तर त्याने तिला ऑटो करुन दिला आणि तो ऑटो कडे बघत ऑटोच्या दिशेने एकटाच पायी निघुन गेला.

मालटेकडीवर प्रत्येक वयातील लोक फिरायला येतात, एक सेवानिवृत्त शिक्षक रोज मालटेकडीवर सकाळी आणि सायंकाळी फिरयाला यायचे. मी ज्या जागेवर बसायचो त्याच बाजुला हे गृहस्थ बसायचे. अशातुनच आमची ओळख झाली. एकदा ते स्वत:हून माझ्याशी बोलते झाले, 'काय शिकतो आहे?' शिक्षक असल्यामुळं त्यांचा हा प्रश्न रास्त होता. मी उत्तरलो, ''मराठी वाङ्.मयात एम. ए. आणि एल. एल. बी. झालंय''

एखादी आजी जशी आपल्या नातवाला गोष्ट सांगते तशे ते सद्‌गृहस्थ मला गोष्ट सांगू लागले, म्हणाले, 'एल. एल. बी. वरुन एक जुनी गोष्ट आठवली म्हणून सांगतो तुला-

'रस्त्याच्या कडेला निंबाच्या झाडाखाली एक पंक्चर दुरुस्तीची छोटीशी टपरी होती. मध्यम वयीन मनुष्य अन् त्याचा विजय नावाचा मुलगा ती टपरी चालवत. त्या गृहस्थाने विजयला शाळेतही टाकलं होतं. विजय शाळा सांभाळून वडिलांनाही मदत करायचा. फाटलेल्या, थिगळ लावलेल्या चड्डीवर विजयने कसंतरी दहावी पर्यंत शिक्षण पूर्ण केलं. आर्थिक परिस्थीती चांगली नसतानाही एक वर्षाची गॅप घेऊन विजयने अकरावीला प्रवेश घेतला. कॉलेजमधल्या एका संजना नावाच्या मुलीचा विजयवर जीव जडला होता. संजना साधारण घरची मुलग. संजना विजयशी जवळीकता साधण्याचा प्रयत्न करायची पण विजय तिला मुद्‌दाम टाळायचा. संजनाचं विजयवर जवळपास सहा एक महिणे तरी एकतर्फीच प्रेम होतं.

शिकवणी वरुन येताना संजनाची सायकल पंक्चर झाली. पंक्चर दुरुस्त करण्यासाठी संजना एका टपरीवर गेली. एक मुलगा तेथे सायकल दुरुस्त करीत होता त्याच्याकडे बघत संजना म्हणाली 'दादा पंक्चर दुरुस्त करुन देता का?' दुस-या एका सायकलचं काम करित असलेला विजय आवाजाच्या दिशेने डोळे भिरकावतो तर समोर संजना ! संजनाच्या मनात काय सुरु असेल याची कल्पना नाही. कामाची लाज न बाळगता विजय संजनाच्या सायकलचा पंक्चर दुरुस्त करीत होता. हिच्याशी काय बोलावं म्हणून विजय बोलायचं टाळत होता पण संजनानेच कॉलेजच्या गोष्टी काढल्या आणि दोघे बोलू लागले. गेल्या सहा एक महिण्यांपासून संजना विजयवर एकतर्फी प्रेम करीत होती पण आज विजयला सायकल दुरुस्त करताना बघून तिने काय निर्णय घ्यावा?

परिस्थिती काहीही असो संजनाचं विजयवर प्रेम होतं म्हणूनच संजनाने विजयला दुस-याच दिवशी आपल्या मनातलं सांगितलं. विजय विचारातच पडला. 'मी पंक्चर दुरुस्त करणारा मी काय कुणावर प्रेम करु शकतो?' म्हणत विजयने संजनाला सगळया परिस्तितीचा हवाला देत 'तू माझा नाद सोड' असं सांगितलं. पण पुढे संजनाने

छोटया छोटया गोष्टींवरुन विजयच्या मनात आपलं स्थान घट्ट केलं. आणि शेवटी विजय संजनाच्या प्रेमात पडलाच. संजनाला होकार देण्यापूर्वी विजयने त्याचं आर्थिक वलय संजनापुढे उलगडून स्पष्ट केलं होतं.

संजना आणि विजय दोघेही बारावी पास झाले. संजनाने बारावी नंतर शिक्षण थांबवलं. तिने विजयला पंक्चर दुरुस्त करणे बंद करण्याचा आणि ऑटो चालवण्याचा सल्ला दिला. विजय ऑटो भाडयाने घेऊन चालवू लागला. परिस्थितीमुळे विजयच्या शिक्षणात एक वर्षाची गॅप पडली. प्रेम केलं तर त्याचं रुपांतर लग्नात केलंच पाहिजे म्हणून दोघांनीही घरी विषय काढला. विजयच्या घरचे लग्नाला तयार होते पण संजनाच्या घरचा विरोध होता. खुप प्रयत्नानंतर विजयच्या घरच्यांनी दोघांचं लग्न लावून दिलं. लग्ना नंतर कमवावं, शिक्षण घ्यावं की संसार करावा हे त्रिशुल विजयच्या मनात धुमसत होतं. कुठल्यातरी सरकारी योजनेतून संजनाने शिलाई मशीन घेतली. ती दिवसभर मशीनवर काम करुन विजयच्या शिक्षणासाठी पैसा जमवीत होती. विजयच्या ऑटोतून मिळणा-या पैशातून काटेकोरपणे घर चालवीत होती. थोडे पैसे जमा झाल्यावर तिने विजयला पुढे शिकण्याचा सल्ला दिला पण बी. ए. वगैरे करुन उगाच पैशे अन् वेळ वाया घालवण्यात विजयचा रस नव्हता म्हणून विजय शिकण्याचं टाळत होता पण दुसरीकडं त्याच्या मनात शिकावं मोठं व्हावं हे पण वादळ उडत होतं. संजनाने विजयला एल. एल. बी. ला ॲडमिशन घेण्याचं सांगितलं तेव्हा तो खद्कन हसला. बारावी नंतर पाच वर्षाच्या एल. एल. बी. ला प्रवेश मिळू शकतो ही सगळी माहिती तिने काढली. संजनाच्या हट्टापाई शेवटी विजयला एल. एल. बी. ला प्रवेश घ्यावाच लागला. विजय ऑटो चालवून कॉलेज करु लागला. शिलाई मशीन आणि ऑटोपासून मिळणा-या पैशातून घर चालायचं आणि विजयच्या शिक्षणातही मदत व्हायची. रात्रीला जास्त भाडं मिळतं म्हणून विजय सकाळी उशीरा पर्यंत ऑटो चालवीत होता.

अशातच संजनाची लग्नानंतरची पहिली दिवाळी आली. पहिल्या दिवाळीसाठी संजनाला माहेरुन घ्यायला कोणीच आलं नव्हतं बोलावणंही आलं नाही, कारणही तसंच होतं ! विजयच्या प्रेमाने संजनाला कधी तिच्या माहेरची आठवणच येऊ दिली नाही. दिवाळीचे दिवस होते, परिस्थितीमुळे फराळाचं काही बनवावं हा विषयच नव्हता. दिवाळीचा दिवस. स्वयंपाक ही करावा अन् घरासमोर दिवे पण लावावे एवढं तेलही घरात नव्हतं. सायंकाळी विजय ऑटो चालवून घरी आला. दिवे लावण्याची वेळ झाली होती. संजनाने नेहमी प्रमाणे एक दिवा घरात देवाजवळ लावला. दुसरा दिवा तुळशीपुढं आणि एक दिवा दारा समोरच्या छोटयाश्या रांगोळीवर ठेवला. विजय घरी आला तेव्हा सायंकाळी देवाची पुजा करताना संजनाने विजयला ओवाळलं आणि त्याच्या हातात विकत आणलेलं एक नवं कोरं शर्ट दिलं. पहिली दिवाळी असून आपण हिला साडी नाही घेऊ शकलो पण हिने मला शर्ट दिलं म्हणून विजयच्या मनात खूप भरुन आलं त्याच्या डोळयातून अश्रृ वाहू लागले. विजय चटक्न उठला अन् संजनाला मिठीत घेतलं. तिच्या खांद्यावर डोकं ठेऊन स्वत:ला दोष देत रडतच बोलू लागला ''आपल्या अंगणात आज दिव्या रांगोळयांची भव्य आरास नाही, जेवणातही काही नवीन नाही रोजचंच आहे, मी तुला आजच्या दिवशी सुद्धा दोन गोड घास नाही देऊ शकलो पण तू मला एवढं प्रेम देऊन जगातला सगळयात मोठा आनंद दिलाय.'' संजना त्याला समजावत होती, ''मला दिवाळी नको, दिवे नको, नवं काही नको, मला तुझं प्रेम मिळतंय तेच माझ्यासाठी सगळं आहे, खरं तर मला माफ कर पुढच्या महिण्यात पैशांच काम आहे म्हणून पैसे जमा केले पण फक्त तुझं प्रेम म्हणून त्यातील काही पैशाचं फक्त शर्टच आणलं पूर्ण ड्रेस पण नाही घेऊ शकले''

दोन जीवांची ज्योत प्रेमाने एक होऊन तेवत होती त्यांच्या प्रेमाने प्रकाशमान झालेल्या दिव्यांपुढे दिवाळीच्या पणत्याही आज फिक्या पडल्या होत्या.

संजनाने विजयला आता ऑटो चालवणं बंद करायला लावून फोटोग्राफी करण्याचा सल्ला दिला. विजय ऑटो चालवून त्याच्या मित्रासोबत लग्नप्रसंगी जाऊन फोटो काढणे शुटिंग करणे शिकत होता. हळूहळू विजयचा ऑटो चालवणे बंद झाला. फोटोग्राफीच्या व्यवसायात त्याचा चांगलाच जम बसला. पूर्वी भाडयाने कॅमेरा घेऊन विजय व्यवसाय करिता होता पण व्यवसायात चांगलाच जम बसल्याने त्याने स्वत:चा कॅमेरा विकत घेतला. त्याने संजनालाही शुटिंग

आणि फोटो काढणे शिकवलं. विजयने एक छोटं दुकान भाडयाने घेतलं. संजनाच्या मदतीमुळे विजयला काम करुन कॉलेज आणि अभ्यासासाठी वेळ मिळत होता. अशातच विजयचं एल. एल. बी. आणि बघता बघता एल. एल. एम. पूर्ण झालं. विजय आता एका वकीला जवळ प्रॅक्टिस करीत होता. संजना शिलाई मशीन सांभाळून आता फोटोग्राफी पण करित होती. जे. एम. एफ. सी. च्या जागा निघाल्या विजयने सहज फॉर्म भरला आणि विजय त्यातही पास झाला. संजनाच्या आनंदाला पारावार नव्हता तिचा पंक्चर दुरुस्त करणारा ऑटो चालवणारा विजय आता साहेब बनला होता.

संजनाने गरीबीमुळं अपत्यांचा विचार केला नव्हता. विजय न्यायाधिश झाल्यामुळे संजनाने अपत्यांचा विचार केला. दोघांना दोन गोंडस जुळी मुली झाली. एक मुलगा आणि एक मुलगी. आज हे दोघेही बहीण भाऊ विदेशात एका मोठया मल्टी नॅशनल कंपणीत चिफ ऐक्सिकेटिव्ह इंजिनिअर आहेत. विजय न्यायाधीश आणि दोन मुले विदेशात मोठया पदावर कार्यरत आहेत. हे सगळं केवळ संजनाच्या निरपेक्ष प्रेमामुळे आणि सहकार्यामुळे होऊ शकलं., नाही तर फाटक्या चड्डीवर पंक्चर दुरुस्त करणारा, ऑटो चावणारा, फोटोग्राफर असा जगातला कोणता विजय न्यायाधीश झाला असता आणि त्याची मुले विदेशात नोकरीला गेली असती?’



शिक्षणाविषयी मी स्वत:ला वाट चुकलेला प्रवाशीच समजतो. काय काय शिकावं, किती शिकावं आणि का शिकावं माहीत नव्हतं पण एखादया संताच्या 'तुम्ही चालत रहा, एक ना एक दिवस ध्येयापर्यंत नक्कीच चोहचाल' या ऊकती प्रमाणे मी नुसता पर्वतातील एखादया वेडया वाकडया घाटाप्रमाणे शिकत गेलो. एम. ए. नंतर पी.एच.डी., नेट, सेट, यांचा विचार करत असताना अचानक एल. एल. बी. ला ॲडमीशन का घेतली माझं मलाच माहीत नाही. एम. ए. ला सोबत असतानाचा माझा मित्र एकदा घरी आला. ब-याच दिवसांनी भेटल्यावर जुन्या आठवणी ताज्या व्हाव्या, मोकळं बोलता यावं म्हणून गप्पा टप्पा मारायला आम्ही दोघेही मालटेकडीवर गेलो. बोलता बोलता एकेका मित्रांची त्यांच्याशी घडलेल्या किस्यांसवे आवठवण येत होती.

वाड्.मय विषय घेऊन एम. ए. स्नातक विषय घेतलेले आम्ही विद्यार्थी. काही दिवसातच कॉलेज नियमीत सुरु झालं. वाड्.मयाचे विद्यार्थी असल्याने सगळीकडे भावनिक वारे वाहत होते. नुसत्या मित्र मैत्रिर्णीची नाती कधी गाढ मैत्रित अन् काही नाती बहिण - भावांच्या स्वरुपात कशी गुंफल्या गेली कळलंच नाही. प्रत्येकाचं दु:ख आम्हाला स्वत:चंच वाटायचं. प्रत्येकाचं दु:ख वाटून घेऊन आम्ही जगत होतो.

तसे अनेक प्रेम प्रकरणं या दिवसांत दिसले काही एकतर्फी, काही जीव देईल पण तुला माझ्या पासनं दूर करणार नाही, आपण फक्त प्रेम करायचं लग्न नाही असे नानावीध प्रेमाचे प्रकार बघायला मिळाले.

अपूर्वा, संकेत, ध्रुव आणि वेदांत या चौघांमध्ये फिरणारी ही कॉलेजच्या दिवसांतील पहिली प्रेमकथा. ( यातील नावे काल्पनिक असली तरी घटनेचा मात्र वास्तविकतेशी संबंध आहे. )

अपूर्वाचं एक वर्षापूर्वी संकेत नावाच्या मुलावर जीवापार प्रेम होतं. प्रेमातील अनेक उन्हाळे पावसाळे त्यांनी पाहिले होते. प्रेमाचं रुपांतर आता लग्नात व्हावं एवढीच दोघांची प्रामाणिक ईच्छा होती. दोघेही एकाच जातीचे असल्याने लग्नाला विरोध होणार नाही म्हणून दोघांनीही घरी लग्नाचा विषय काढला. अपूर्वाला बघायला पाहूणे येऊ लागले प्रत्येकदा ती घरच्यांना नकार सांगायची. घरच्यांनी कुठे काही असेल तर सांग असं विचारलं असता खरं सांगायची हिच योग्य वेळ आहे असं समजून अपूर्वाने घरी सगळं खरं सांगितलं

पण केवळ मुलगा कुठेतरी कॅटरींगचा व्यवसाय करतो तो सरकारी नोकरीवर नाही म्हणून घरच्यांनी त्यांच्या लग्नाला विरोध केला. अपूर्वा पळून जाईल या भितीने तिच्या घरच्यांनी तिला चार दिवस चार भिंतींच्या आत कोंडून ठेवलं. अपूर्वाला श्वास पण घ्यावासा वाटत नव्हता. जाळयात अडकलेल्या एखाद्या पाखरा सारखी तिची अवस्था झाली होती. जीव नकोसा झाला होता तिला. नेहमी गाणे ऐकणा-या अपूर्वाला आज गाण्यांचा आवजही सहण होत नव्हता. सगळं नको नकोसं वाटत होतं. संकेतनेही अपूर्वाला प्राप्त करण्यासाठी शरतीचे प्रयत्न केले पण सगळे विफल. संकेतच्या घरच्यांनी म्हणे संकेतचे पण खूप हाल केले. सगळया हाल अपेष्टा सहन करत संकेत अपूर्वाला प्राप्त करण्याचा जिकरीने प्रयत्न करीत होता. घरचे दोघांच्याही ठाम विरोधात होते. कारण होतं फक्त मुलगा सरकारी नोकरीवर नाही अन् मुलांनी प्रेमविवाह केला तर समाज काय म्हणेल? या दोघांच्याही घरच्यांचे पोट काय समाजातील लोकांवर अवलंबून होतं? साडे बारा पैकी बारा जातींपेक्षा केवळ अर्धी जात वेगळी होती तरी जात एकच होती म्हणजेच जातीचाही प्रश्न नव्हता मग दोघांच्याही घरच्यांची कुठली मनोवस्था असेल जी संकेत अन् अपूर्वाच्या विवाहात अडथडा निर्माण करित होती?

संकेतच्या घरच्यांनी संकेतसाठी स्थळ पहाणे सुरु केले. संकेतने आता ठाम निर्णय केला जर अपूर्वाचं आणि माझं लग्न नाही झालं तर अशा मुलीशी लग्न करेल जी मी पसंत केलेली असेल. संकेतच्या घरच्यांनी होकार दिला. संकेतसाठी स्थळ आलं. तसं हे त्याचं पहिलंच स्थळ होतं. त्या मुलीचा घटस्फोट झालाय, स्वभावाने फटकळ असणारी, कुणाशीही जुळवून न घेणारी मुलगी असल्याचं संकेतला कळलं आणि त्याच क्षणी संकेतने त्या मुलीला होकार दिला. आठ दिवसाच्या आत संकेतचा विवाह त्या मुलीशी झाला सुध्दा. अपूर्वा या सगळया गोष्टींपासून अनभिज्ञ होती. बीजाला जमीणीत कितीही लपवलं तरी बिजातून अंकूर बाहेर येतोच सत्यही तसंच कालांतराने का होईना बाहेर येतंच. अपूर्वाला संकेतच्या लग्नाची सारी बातमी तिच्या मैत्रीणीकळणं समजली. लाकुडतोडया जसा निर्दयीपणाने झाडवर प्रहार करतो तशी नियती अपूर्वाच्या मनावर आघात करीत होती. माझ्यामुळं संकेतच्या आयुष्याचं वाटोळं झालं म्हणून अपूर्वाचं मन संकेतसाठी तिळतिळ तुटत होतं. अश्रूंच्या महापूरात वाहुन गेलेले तिचे डोळे केव्हाच कोरडे पडले होते. ती सारखी रडतच असायची पण तिचे अश्रू कुणाला दिसायचे नाही. तिचे अश्रू थांबले होते पण तिचं मन सतत रडत असायचं. डोळे रडले की अश्रू दिसणारच पण मन रडतंय हे कसं सिद्ध करुन दाखवावं कुणी?

लग्नानंतर संकेतने शहर सोडलं. संकेत अन् त्याची बायको सोबत कुठे गेले तरी समाज आता संकेतच्या आई वडिलांना दोष देत होता. तोच समाज ज्या समाजाचा संकेतच्या आई वडिलांनी विचार करुन संकेत आणि अपूर्वा यांचं लग्न टाळलं होतं. संकेत घटस्फोटीत नसुनही त्याचं एका घटस्फोटीत मुलीशी लग्न लावून दिलं म्हणून संकेतच्या जातीतील लोक संकेतच्या आई वडीलांना दोष देत होते. संकेतच्या बायकोने संकेतला आपल्या आई वडिलांपासून वेगळं रहायला भाग पाडलं होतं.

वावटळीसोबत उडणारा पाला पाचोळा काही वेळाने जमीणीवर येवून स्थिरावतो तसंच संकेत आणि अपूर्वाच्या जीवनात आलेलं वादळ शांत झालं होतं या वादाळाने मागे ठेवल्या फक्त तिच्या काळया कुट्ट पाऊल खुणा, आणि आठवणींचा सडा !

अपूर्वाच्या शिक्षणाचा विचार करता तिच्या आई वडिलांनी तिला शिकण्यासाठी घराबाहेर जाण्याची परवानगी दिली. कॉलेज किंवा कुठेही जाताना तिचा एक दिड वर्षाने लहान असलेला भाऊ तिच्या सोबत असायचा.

अपूर्वा आता आमच्या वर्गात दाखल झाली होती. सुरुवातीला एकटी एकटी राहणारी अपूर्वा तिचा एकटेपणा, मुकेपणा मला वेगळाच संकेत देत होता. का काय माहिती पण मला तिच्याशी बोलावं वाटत होतं. अपूर्वाला रोज तिचा भाऊ कॉलेजला सोडायला यायचा. अपूर्वाची एक खास मैत्रीण आमच्याच वर्गात होती तिला पण मी अपूर्वा बद्दल विचारलं तर ती ही 'तीने मला पण काही सांगतलं नाही' म्हणून विषय टाळून द्यायची. पण अपूर्वाने कुठेतरी जबर धक्का सहण केल्याचं माझ्या मनात येत होतं. अपूर्वाचं आणि माझं बोलणं व्हावं म्हणून मी तसं वातावरणही निर्माण केलं होतं. पण अपूर्वा काही सांगायला तयार नव्हती. पण 'मला तुझा मोठा भाऊ समजून तू सगळं खरं सांग' म्हणताच काही दिवसांपासून बंदिस्त असलेल्या तिच्या डोळयातील अश्रूंचा बांध अचानक फुटला, अश्रूंच्या प्रवाहासोबत तिचं सत्य बाहेर पडत होतं. तिचं सारं ऐकूण आम्ही देखील हवालदिल झालो होतो. संकेत आता काय करतोय अन् त्याच्या लग्नानंतर तुम्ही कधी भेटला होता का? विचारलं असता तीने उत्तर दिलं 'त्याने हे शहर सोडलंय, हे शहर सोडण्यापूर्वी आम्ही एकदा भेटलो होतो. ती भेट संपूच नये, आमची भेट झाल्यावर जगाचा अंत आम्ही भेटलेल्या त्या शेवटच्या क्षणातच असावा असं वाटायचं.'

तिचं हे सगळं ऐकताना मी दीर्घ श्वास घेऊन सोडला. माझ्या मनात विचारांची रेलचेल सुरु झाली.

या अपूर्वाला आम्हाला खूप जपायचं होतं. तिला जपण्यात आमचं पहिलं वर्ष केव्हा संपल कळलंच नाही. आम्हा सर्वांत दाट मैत्री जुळली होती आम्हाला दिवाळी आणि उन्हाळयाच्या सुटया पण नको होत्या. बघता बघता दुसरं शैक्षणिक वर्ष सुरु झालं. अपूर्वाच्या भूतकाळावर नव्या वर्तमानाची चादर पांघरण्यास आम्ही यशस्वी झालो होतो.

ध्रुव आणि वेदांत आमच्याच वर्गात शिकत होते. वेदांत नोकरीवर होता. अपूर्वाचं ध्रुव वर मन आलं होतं. पण आधिच एवढा काळा कुट्ट भूतकाळ अन् ध्रुवला कसं बोलायचं म्हणून तिने सगळं मनातच साठवून ठेवलं होतं. भूतकाळ विसरावा म्हणून अपूर्वाचं कुणावर तरी अनुरक्त होणं गरजेचं होतं. म्हणून अपूर्वा कुण्याच्यातरी प्रेमात पडावी असं आम्हाला वाटायचं.

ध्रुव मला नेहमी अपूर्वा बद्दल बोलायचा, माझ्या मनातलं तू तिच्या पर्यंत पोहचव म्हणायचा आणि त्याच वेळेस वेदांत मलाच मध्यस्थ बनवू पहात होता. वेदांतचं मन अपूर्वावर आलं असतानाच अपूर्वाचं मन मात्र ध्रुववर आलं होतं.

आम्ही सगळयांनी चिखलद-याला जायचं ठरवलं. पण अपूर्वा यायला तयार नव्हती कारण तिला तिच्या घरचे बाहेर कुठे जाऊ देतील असं वातावरण तिच्या घरचं नव्हतं. केवळ ध्रुववर मन आलंय आणि चिखलद-याला ध्रुव पण असेल म्हणून घरी खोटं बोलून अपूर्वा आमच्या सोबत चिखलद-याला आली. ध्रुव सोबत असेल म्हणून चिखलद-याला येण्यासाठी अपूर्वाने खूप प्रयत्न केले. शेवटी चिखलद-याला जाण्याचा दिवस उजाळला. ध्रुव अपूर्वाच्या सोबत असेल म्हणून वेदांत चिखलद-याला यायला तयार नव्हता. चिखलद-यासाठी निघताना अचानक वेदांत आला त्याला बघुन अपूर्वा आमच्या सोबत यायला तयार नव्हती. सगळयांच्या समजवण्यामुळे ती यायला तयार झाली. सातपुडयाच्या प्रशस्त पहाडांना साक्षी ठेवून आपण सात

जन्मापर्यंत सोबत रहायचं हा निर्णय ध्रुव आणि अपूर्वा दोघांनीही घेतला. ध्रुव आणि अपूर्वा यांच्या प्रेमाचं नवं पर्व सुरु झालं. वेदांत मात्र अपूर्वा आणि ध्रुवचं प्रेम बघुन कासावीस होत होता. उंचा वरुन कोसळणा-या पाण्यासारखं आपणही एखाद्या दरीत कोसळून जावंसं वेदांतला वाटत होतं.

ध्रुव आणि वेदांत दोघेही माझे चांगले मित्र. या दोघांमध्ये उठता बसता माझीच गोची व्हायची. भुतकाळामुळे अपूर्वाने ध्रुवला सुरुवातीला नाही म्हटलं होतं. तेव्हा ध्रुव रोज मला एखादी दु:खी दर्दभरी कवीता करुन वाचुन दाखवायचा. त्याची दर्दभरी दास्ता वाचताना त्याने काय लिहीलंय मला काहीच कळायचं नाही, पण तो त्या कवितेचा अर्थ मोठया दर्दीपणे माझ्या मनात कोंबायचा. दुसरीकडे वेदांतचं पण गा-हाणं मलाच ऐकावं लागायचं. ध्रुव आणि अपूर्वा एकमेकांच्या प्रेमात पडल्यावर वेदांतचे हाल बघवत नव्हते. त्याच रात्री मी टी. व्ही. वर शाहरुख खानचा देवदास चित्रपट बघितला रात्रभर स्वप्नात चित्रपटातला देवदास आणि वेदांत दोघेच दिसत होते.

उन्हाळयात अपूर्वा ध्रुवला भेटायला जायची तेव्हा तिच्या पायात सॅंडल नसायची हे माझ्या लक्षात आल्यावर मी तिला विचारलं तर म्हणाली, ‘ध्रुवला भेटायला जाताना माझे तळपाय पोळतात माझं सगळं लक्ष माझ्या भाजणा-या पायांवर असतं ज्याने मला संकेतची आठवण येत नाही माझं मण फक्त माझ्या पायात असतं ज्याने मी ध्रुव सोबत एकनिष्ठ राहू शकते. जर मी ध्रुवला भेटायला निघाले आणि मला संकेतची आठवण आली तर मी ध्रुवशी एकनिष्ठ राहू शकणार नाही म्हणून मी पायात काही न घालता ध्रुवला भेटायला जाते.’ जरा अतिच झालं म्हणा हे !

अपूर्वा आणि ध्रुव यांच्या प्रेमाचे काही महिणे उलटून गेले. अपूर्वाने ध्रुवला लग्नाबद्दल विचारलं. जात एकच असल्याने मध्यस्थही मिळाला होतो. घरी आपलं एकमेकांवर प्रेम आहे असं न सांगता तू त्या व्यक्तीला माझ्या घरी पाठव असा सल्ला अपूर्वाने ध्रुवला दिला पण अचानक ध्रुवच्या मनात काय आलं काय माहिती, अपूर्वाशी बोलणं झालं नाही तर कासावीस होणारा ध्रुव आज अपूर्वाला चक्क हळूहळू नाकारत होता. ध्रुवने अपूर्वाला आपला नकार कळवून अचानक धक्काच दिला. तिच्या जीवनात भुतकाळाचं पुनरागमण होतं की काय असंच वाटायचं. अपूर्वा एकदा माझ्याशी बोलताना म्हणाली होती ‘माझा अरेंज मॅरेजवर विश्वास नाही. ज्या व्यक्तीला आपण पूर्वी कधी ओळखतही नव्हतो त्या व्यक्ती सोबत लग्न करुन दुस-याच दिवसापासून संसार करायचा याची मला फार भिती वाटते म्हणून मला अरेंज मॅरेज करायचं नाही.’ तिचं हे बोलणं अगदी रास्त होतं पण तिला समजवावं तरी कसं हे पण सुचत नव्हतं. अपूर्वासाठी कासावीस होणा-या ध्रुवने चक्क आज तिला नाकारावं हे माझ्या विचारशक्तीच्या पलिकडे होतं.

अपूर्वाच्या मनाचा प्रवाह आता वेदांतकडे वाहत होता. वेदांतला अपूर्वाचा भुतकाळ माहीत होता अपूर्वा पण काही लपवणार नव्हती. अपूर्वाने वेदांतला तिच्या मनातलं सगळं सांगितलं पण वेदांतसुध्दा ध्रुव सारखा अपूर्वाला नाकारत होता. वेदांतला मी नकाराचं विचारलं तर तो म्हणाला ‘काल तिच्या जीवनात संकेत होता, आज ध्रुव आहे आणि मी उद्या तिच्याशी लग्न केल्यावर तिच्या जीवनात एखादा रमेश आला तर?’ त्याच्या या उत्तराने माझ्या विचारशक्तीला सुन्न करुन ठेवलं. अगदी शरीरातली शुगरची मात्रा कमी झाल्यावर होतं तसं !

त्यादिवशी अपूर्वा आणि वेदांत दोघेही क्लासला आलेच नाही. कॉलेज झाल्यावर वेदांतला मी 'कुठे गेला होता आणि अपूर्वा दिसली का?' विचारलं. तर तो म्हणला 'अपूर्वा आणि मी सोबतच होतो. मी अपूर्वाला हो म्हटलं.' मला अगदी सुखद धक्का बसला. मी वेदांतला कालच्या बोलण्याबद्दल विचारलं तर तो म्हणाला 'अपूर्वाने मला सहा महिणे त्रास दिला मग मी तिला एक दिवस त्रास दिला तर बिघडलं कुठे ? अपूर्वाला त्रास होऊ नये म्हणून मी कधी तिला माझं दु:ख सांगितलं नाही, माझ्यामुळे ती दु:खी होऊ नये म्हणून मी तिच्या पासून दूर राहीलो पण तिला त्रास दिला नाही. माझं प्रेम तकलादू, खोटं, बेगळी नव्हतं. एकतर्फीच का होईना पण मी अपूर्वावर खरं मनापासून प्रेम केलं म्हणून आज मी अपूर्वाला स्वीकारलं.'

पुढे अपूर्वा आणि वेदांत यांना त्यांच्या लग्नासाठी खूप उठाठेव करावी लागली. अपूर्वाच्या भावाने त्याच्या आई वडिलांना न सांगता प्रेमविवाह करुन घरात सुन आणली म्हणून या वेळेस अपूर्वाचं लग्न तिच्या मनाप्रमाणे करुन द्यावं लागलं. आज अपूर्वा आणि वेदांत यांच लग्न होऊन दोघांचाही संसार सुरळीत चालु आहे.

अपूर्वाच्याच मैत्रीणीची आता ही एक दुसरी छोटीसी प्रेम कथा. शर्वरी अपूर्वाची खास मैत्रीण. शर्वरीचे आई वडील तिच्या लहाणपणीच वारलेले. सलील शर्वरीचा मामेभाऊ, दिसायला शर्वरीपेक्षाही सुंदर. शर्वरी तिच्या गरीब मामाकडे राहायची. शर्वरी जेवढी गरीब सलील तेवढाच श्रीमंत. सलील चांगल्या नोकरीवर होता.


सौंदर्यावर सगळेच प्रेम करतात पण हा सलील शर्वरीच्या परिस्थितीवर रोष व्यक्त करुन तिला सुखाचे दिवस प्राप्त करुन दयावे म्हणून शर्वरीवर प्रेम करत होता. सलील चांगल्या श्रीमंत घरचा, देखणा, चांगला नोकरीवर त्याच्याही जीवनात चांगली मुलगी आली असती पण सलीलने प्रेम केलं ते शर्वरीवर. सलील अन् मी नेहमी कॅन्टीनवर बसायचो, एकदा मी त्याला विचारलं, ''राग येऊ देऊ नको, तू शर्वरीपेक्षाही सुंदर, चांगल्या नोकरीवर आहेस पण तू शर्वरीवर प्रेम का केलंस?'' तर त्याचं उत्तर, ''प्रेम कुठेही फुलतं त्याचा नेम नसतो. स्वत:साठी सगळेच जगतात पण दुस-यांसाठी जगुण बघा त्यात किती आनंद असतो.'' पुढे या दोघांनीही लग्न केलं.

अपूर्वा आणि शर्वरी नंतर या वर्षी दिसलेली ही आणखी एक प्रेमकथा. पार्थ नावाचा माझा मित्र आमच्या ज्यूनिअरच्या म्हणजेच संयोगीताच्या प्रेमात पडला. सुरुवात संयोगीताची होती पण पार्थचा अंत होता होता वाचला. संयोगीताला पार्थ आवडत असावा म्हणून तिने पार्थ जिथे बसायचा तिथे ''व्हाट ईज यूवर कॉन्ट्यक्ट नंबर'' लिहिलं होतं हे आमच्या लक्षात आलं पण भोळया पार्थच्या काही लक्षात आलंच नाही. सगळं त्याला समजावून सांगावं लागलं, तेव्हा भीत भीत त्याने त्याचा नंबर डेक्सवर लिहीला, त्याखाली आमच्यापैकी एकाने पार्थला माहीत नसताना 'तू पण तुझा नंबर दे' असं लिहीलं. दुस-याच दिवशी तेथे नंबर तयार. मिसकॉल, मॅसेज, कॉल करता करता संयोगीता आणि पार्थ नेटवर्कमध्ये आले. दोघांचही बोलणं व्हायचं पण प्रास्ताविक असं बोलणं कधी पार्थला जमलंच नाही. दोघेही एकमेकांशी स्पष्ट बोलावे म्हणून आम्ही त्यांना मुद्दाम बाईकने लॉंग ड्राईव्हवर घेवून गेलो. दोघे तेथेही बोलायला तयार नव्हते. दोघे सोबत असुनही संयोगीताने पार्थला मिसकॉल दिला बहुतेक ती त्याला बोल म्हणत असावी. दोघांचही बोलणं व्हावं म्हणून आम्ही तेथून निघूण गेलो. आता ते एकमेकांसोबत काही तरी बोलणार तेव्हाच खेडेगावातील आठ दहा मुले आली आणि बिच्चा-या दोघांनाही तेथून पळ काढावा लागला. दोघांच्याही मनात काहीतरी होतं हे आम्हाला ठाम माहित होतं पण 'भीती वाटते ना बोलायची म्हणून न बोल्लेलं बरं' असं आमच्या पार्थचं वाक्य. संयोगीता बघायला एवढी

सुंदर की ती ऑटोतून उतरली की आजुबाजूच्या मुलांनी तिच्याकडे एकटक बघू नये तर नवलंच! पुढचे पंधरा दिवस असेच गेले. शेवटी तिला मुलगा बघायचा आला हे कळल्यावर आमच्या पार्थची हिम्मत वाढली 'आता येवू दे तिला कॉलेजला, तिला एकदाचं सांगूणच टाकतो.' अशा तयारीत असताना तिचा साखरपूडा देखील होऊन गेला. ही संयोगीता म्हणजे माझ्यावर प्रेम कर हवं तर लग्न करु नको अशा विचारांची होती. पार्थची चुलत बहीण राधा आणि संयोगीता पूर्वी एकाच क्लास मध्ये होते राधानेच संयोगीताची सगळी खरी माहीती वजा 'इतिहास' पार्थला सांगितला.

पार्थ छाती फुगवून सांगायचा ''आपल्याला पहिलेच माहीत होतं ती कशी आहे, म्हणून तर मी खोलात गेलो नाही.'' असा भित्रा पण हार न माणनारा आमचा पठ्या.

आजच्या चर्चेने माझ्या जीवनातील अनेक गोष्टी आता मालटेकडीलाही कळल्या.



रात्री मी आणि माझा मित्र सोबत अभ्यास करायचो. अभ्यास करुन क्षिणलेलं डोकं हलकं करायला आणि झोपेची गुंगी घालवायला आम्ही रात्री एक दोन वाजता गाडीने इर्वीन चौकातील चहाच्या कॅन्टीनवर चहा प्यायला जायचो. हॉस्पीटलमुळे तेथील चहाची कॅन्टीन रात्रभर चालू असायची. घरी उगाच गॅस जाळा, चहाचं पातेलं भरवा, घरी कुणाला शंका येवू नये म्हणून कप आणि पातेलं धुऊन जशीच्या तसी ठेवण्यापेक्षा बाहेर दिड रुपया खर्च करणं आम्हाला रास्त आणि स्वस्त वाटत होतं, पण तो चहा तेव्हा आम्हाला महागात पडायचा हे आता कळलं कारण तेव्हा पेट्रोलचे पैशे हिशोबात घेण्याचं आम्ही विसरलो होतो.

रात्रीचा दिड वाजला होता. भजणात एकरुप होणा-या वारक-सारखा मी थोडा वेळ झोपेत दंग व्हायचो. पण परीक्षा नावाचं भूत माझं झोपण्याचं स्वप्न भंग करायचं. थोडा वेळ झोप लागली तरी अभ्यास, परीक्षा, पेपर, मास्तर, निकाल हे सारे पंचमहा'भूत'झोपेत यायचे. झोप घालवण्यासाठी आम्ही नेहमी प्रमाणे चहा प्यायला जायला निघालो, मालटेकडीच्या कडेला शांत चंद्र दिसत होता. दर्ग्याच्या अगदी मागे दिसणारा चंद्र मालटेकडीला चार चांद लावत होता. मी हे बघण्यात दंगच होतो तर माझा मित्र म्हणतो, ''यार आपण नेहमी सूर्यास्त बघतो पण आज आपल्याला चंद्रास्त बघायचा आहे.'' माझ्या मनातलं बोलल्यानं मी पण तयार झालो. अभ्यासाने येणारी झोप रोज चहा घालवायचा पण आज चंद्रदर्शनाने झोप पुरतीच गायब झाली होती, पण शेवटी तो चहाच त्याला कोण नाही म्हणनार म्हणून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो म्हणजेच चहाची टपरी गाठायला. चहा प्यायला जाताना चंद्राचा मुखडा न्याहाळतंच चाललो होतो.

चहा पिऊन घरी आलो, रात्रीचे दोन वाजलेले, गाडी घरात ठेवून आम्ही दोघेही मित्र भुता खेता सारखे मालटेकडीवर गेलो. चंद्रास्त होण्याची वाट बघत होतो पण चंद्र काही केल्या खाली उतरत नव्हता. चंद्रास्त व्हायला अजून बराच वेळ आहे असं एकंदर खगोलीय स्थितीवरुन वाटत होतं. एवढया रात्री टेकडीवर आपण चंद्रास्ताच्या प्रतीक्षेत बसलो तर कदाचीत सूर्यास्त आधी दिसेल म्हणून आम्ही दोघेही घरी परतण्यासाठी मालटेकडी वरुन खाली उतरु लागलो तर अचानक मोग-याचा शीतल शांत सुगंध दरवळत जवळ आला. सुरुवातीला वाटलं सुगंध दर्ग्यात वाहलेल्या फुलांच्या चादरीचा असेल पण सुगंध कोठून तरी जवळूनच येत होता.

मी मित्राला सुगंध घ्यायला लावला तर तो म्हणाला, ‘‘थांबले असतील कोणीतरी रात्री उशीरा पर्यंत, पडला असेल तिचा गजरा.’’ मी म्हणालो, ‘‘नाही रे, पळलेल्या आणि माळलेल्या गज-याचा सुगंध हा वेग वेगळा असतो, हा नक्कीच माळलेल्या गज-याचा सुगंध आहे.’’ मित्राची शंका, ‘‘आता साडेतीन वाजले आहे आणि या वेळेस गजरा माळून कोण बसलं असेल?’’ तो झाडा झुडपात शोध घेऊ लागला, मी आजुबाजुला बघु लागलो तर एक छोटंसं मोग-याचं झुडूप आणि त्याला दोन टवटवीत पांढरी शुभ्र मोग-याची फुलं दिसली. त्या फुलांच्या जवळ जावून मी दीर्घ श्वास घेतला आणि अचानक तोंडातून शब्द बाहेर आले ‘‘मोगरा फुलला’’, मोग-याच्या सुगंधाने मी बेभान झालो होतो. मोगरा, मोग-याची फुलं आणि त्याचा सुगंध मी या आधी बघीतला नव्हता असं नाही पण फुललेला मोगरा मी आज पहिल्यांदाच अनुभवत होतो, म्हणून अचानक माझ्या मुखातून ‘मोगरा फुलला’ हे गाणं आलं आणि तेच गाणं गुणगुणत मी मालटेकडी वरुन खाली उतरु लागलो.

मालटेकडीवर रोज किती तरी जोडपे येतात, आपलं प्रेम व्यक्त करतात. टेकडी असली म्हणून काय झालं, तिच्यावर काय कोणी प्रेम व्यक्त करु नये? प्रत्येक तरुणीला मोगरा आवडतो. मालटेकडी ही मुळातच स्त्रीत्व असलेली म्हणून प्रत्यक्ष निसर्गाने मालटेकडीला मोगरा माळून निसर्गानेच मालटेकडीप्रती आपलं प्रेम तर व्यक्त केलं नसेल?



तशी ही गोष्ट तीन एक वर्षापूर्वी घडलेली पण आज मालटेकडीवर बसलो असताना खालच्या रस्त्यांवर येणा-या जणा-या माणसांना बघून आठवलेली. मुंबईतील व्यस्त असणा-या माणसांप्रमाणे आता प्रत्येकच शहरातील माणसं व्यस्त होताना दिसतात. दैनंदीन व्यस्ततेतून मुक्त होऊन थोडा वेळ काढून आपण सणांच्या माध्यमातून थोडाफार जगण्याचा प्रयत्न करतो. पण कधी कधी हे जगणं सुद्धा काहींच्या नशिबी नसतं.

तीन एक वर्षापूर्वीची ही गोष्ट. दिवाळीला आम्हाला चांगल्या आठ दहा दिवस सुट्या असतात पण यंदा दोन दिवस सुट्या कमी मिळाल्यानं आमच्या दिवाळीत विरझन पडलं होतं.

दिवाळी म्हटलं की सुट्या आणि फक्त मौज मजा. हिच मौज द्विगुणीत करण्यासाठी आपण आपल्या सख्या सोय-यांच्या, आजी आजोबाच्या, मामाच्या गावाला जातो आणि याच कारणामुळं ऐन दिवाळीत गाडयांच बुकिंग फुल्लं होतं. दिवाळीत मला माझ्या बहिणीकडं औरंगाबादला जायचं होतं. खाजगी बसचं बुकिंग फुल! बसने जातो म्हटलं तर तोबा गर्दी असेल म्हणून मी शकल लढवली, आपण लक्ष्मी पुजनाच्याच दिवशी बस गाठायची. कारण दिवाळीच्या रात्री सगळेच लक्ष्मी पुजनात व्यस्त असतील. ११ वाजताची चंद्रपूर शिर्डी बस गाठण्यासाठी बस स्थानकाकडे जाऊ लागलो. मालटेकडीवर जाणारा रस्ता दिसला आणि मालटेकडीवर जाण्याचा मोह झाला कारण दिवाळीचा दिवस होता आणि दिवाळीच्या दिवशी सर्वत्र आकाशात उंच उडणारे फटाके मालटेकडीवरुन बघताना छान वाटतं. पण मालटेकडीवर जाण्याचा मोह आवरला आणि मालटेकडीला बाय बाय करत म्हटलं ''येतो गं मालटेकडी, भेटू परत कधी तरी!''

बस स्थानकावर जाताना मालटेकडीवरचा चौकिदार दिसला, म्हटलं याला नसेल का दिवाळी, दिवाळीची सुटी. लक्ष्मीपुजनाच्या वेळी हा इसम घरी नाही, त्याला वाटत नसेल काय की, आज दिवाळीचा दिवस आणि आपण आपल्या घरी हवं होतो.

बसस्थानकावर पोहचलो तर पाच सहा लोकं बाकड्यावर अंगावर  पांघरुण झोपले होते. एक दोन पोलीसवाले त्यांच्या बाकडयावर काठया मारुन परत जायचे. एखादा सद्‌गृहस्थ, प्रवाशी निद्राधीन होत असेल तर त्याला तो पोलीसवाला धाक दाखवायचा, ‘‘झोपू नका, सामान चोरीला जाईल.’’ दहा बारा प्रवाशी बसची वाट बघत होते, हॉल्टवर असलेले काही ड्रायव्हर, कंडक्टर बसच्या टपावर जेवण करत होते तर दोन तीन बसवर त्यांचे चालक वाहक झोपण्याच्या तयारीत होते. अमरावती बसस्थनकाच्या समोरच असलेल्या मैदानात एक सर्कस आली होती, त्या सर्कशीतील कलाकार सर्कशीचे खेळ आटोपुन लक्ष्मी पुजन करुन फटाके उडवत होते. मी वर आकाशात त्या फटाक्यांना न्याहाळत असतानाच बस आली. वाटलं बसमध्ये चिक्कार गर्दी असेल म्हणुन लगबगीने बस जवळ गेलो तर बसमध्ये मोजुन फक्त तीन प्रवाशी. जागा मिळाल्याचा आनंद झाला.

बस राजापेठ, बडनेरा, मुर्तीजापूर, अकोल्या वरुन बघता बघता चिखली पर्यंत आली आणि धाब्यावर थांबली. दिवाळी असुनही प्रत्येक ठिकाणी माणसं दिसायचे त्यांना सेवा पुरवणारे ऑटोवाले दिसायचे. धाब्यावर, पानटपरीवर काम करणारे दिसले. भल्या पहाटे औरंगाबाद आलं, सिडकोवर बस थांबताच पाच सहा ऑटोवाले अगदी बसच्या दाराजवळ आले. दिवाळीची पुजा आटोपुन हे ऑटोवाले सुद्धा लोकांच्या सेवेत दाखल झाले होते.

ही तीन वर्षापूर्वीची एक रात्र. तसं या रात्री काहीच विशेष घडलेलं नाही पण आज मालटेकडीवर बसलो असता ही गोष्ट आठवली. दिवाळीची दोन दिवस सुटी कमी मिळाली म्हणून आम्ही त्याचा एवढा उहापोह केला पण हा मालटेकडीवरचा चौकीदार, सर्कस मधले कलाकार, बसचे ड्रायव्हर-कंडक्टर, पोलीस, धाबेवाले, पानटपरीवाले यांना आणि इतरही जे भर दिवाळीच्या दिवशी आणि रात्री सेवा पुरवतात त्यांना नसते काय दिवळी? त्यांना नको का सुटी? दोन दिवस सुटी कमी मिळाली म्हणून आम्ही एवढा विचार करत होतो पण हे सणाच्या दिवशी सुद्धा काम करत होते मग त्यांनी काय म्हणावं?



‘‘मालटेकडीवर रोज रोज जाऊन कंटाळा आला’’ असं म्हणनारा व्यक्ती मी आज पर्यंत तरी बघीतला नाही. सकाळची बोचरी थंडी असो वा पावसाळयात मालटेकडीवर गेल्यावर पाऊस पडून आपण अडकलो, चिंब भिजलो तरी मालटेकडी आपल्याला परत परत खुनावतेच.

पावसाळयाचे दिवस होते. नवीन प्रेमात पडलेला प्रियकर सुरुवातीला जसा अगदी वेळेवर येतो तसाय पाऊस पावसाळयाच्या सुरुवातीला हजेरी लाऊन परत गेला तो कायमचाच. पुढे काही दिवसात पाऊस जणू काही बरसणंच विसरला. या मातीला, झाडा फुलांना पाण्याची गरज असताना त्याचा सहवास हवा असताना पाऊस हा असा फितुर झाला की बरसलाच नाही.

पावसाळयात मालटेकडीवर एक पाखरु घरटं बांधताना दिसलं, त्याचं घरटं बांधून पूर्ण झालं होतं, त्यात छोटी छोटी पिल्लंही काही दिवसात दिसू लागली, पण पुढच्या काहीच दिवसात त्या घराटयातली पिल्लं दिसनं बंद झाली, घरटं रिकामं दिसत होतं. पावसाळा असूनही पाऊस गायब झाला होता. एक वृक्ष पावसाच्या प्रतीक्षेत सुकून गेला होता. यावरुन सुचलेली ही गोष्ट...

सायंकाळची वेळ, आकाशात थोडयाफार अंतराने ढग जमलेले होते.मालटेकडीवरील एका झाडावर एक पक्षी घरटं विणत होता, त्याच झाडामागून ढगामागे लपलेला सूर्य आपल्या रंगांच्या छटा पसरवीत होता. बघता बघता ते घरटं बांधून पूर्ण झालं आणि त्यात दोन छोट छोटे जीव जन्माला आले. पिल्लांच्या येण्याने घरटयाला घरपण आलं होतं. त्या पिल्लांना पंख फुटू लागले. सुरुवातीला पिल्लं आकाशात झेप घेवून घरटयात परतायचे. पण एकदा त्यांनी आकाशात झेप घेतली ती कायमचीच. ते पिल्लं आता घरटयात दिसत नव्हते, घरटं वांझ वाटत होतं.

दुसरी कडं पाऊस फितुर झाल्यानं वृक्ष सुकून गेला होता. एखादयाच्या विरहाने जसा एखादा व्यक्ती कृष होतो तसंच हे झाड सुकून गेलं होतं. त्या घरटयाशी आणि झाडाशी नियतीने सारखाच आघात केला होता. घरटयाला पिल्लं सोडून गेली होती तर झाडाला पाऊस. झाडं आणि घरटं दोघेही आकाशाकडे डोळे लावून आपल्या प्रियकराला शोधावं तसे शोधतांना दिसायचे.

‘‘पाखरु घरटं सोडून
आकाशात पावसा संगे खेडू लागलं
वर नभाकडे डोळे भिरकावून
घरटं मात्र रडू लागलं’’

एक दिवस अचानक सायंकाळी काळे ढग आले. पावसाचे चार दोन थेंब हातावर पडले. नभात एक पाखरु घिरकया घालताना दिसलं, म्हटलं चला आज दोघांच्याही विरहाचा अंत होईल, झाडाला पाऊस अन् घरटयाला पाखरु मिळेल म्हणून मन हर्षून गेलं होतं. पाखराने आकाशात घिरक्या घेतल्या, वाटलं पाखरु आता घरटयात परत येईल पण् पाखरु घरटयात न परतता परत आकाशात उंच उडून गेलं. पाऊसही न बरसता निघून गेला.-

‘‘पाखराने पावसाला
वर नभातंच गाठलं,
पाखराने घरटयाला
झाडा सवे फसवलं’’

असंच काहीसं झालं होतं.

काळे ढग दाटले होते, पावसाचे थेंब सुद्धा हळूहळू पडायला लागले. तेव्हाच आकाशातून खाली आलेलं पाखरु परत आकाशात उडून गेलं, त्या पाखरानेच पावसाला वर नभात गाठून काही सांगीतलं तर नसेल? पाखरुच आता पावसाच्या प्रेमात तर पडलं नसेल? म्हणून तर पाऊस पाखरा सोबत आकाशातच थांबला नसेल? पाखराने पावसा पासून झाडाला हिरावून घेतलं होतं त्यासाठी स्वत:चं घरटंही पाखराने वा-यावर सोडलं होतं.

‘‘काही दिवस घरटयाला
अन् झाडाला पाहण्यात निघून गेले
दिवस असेच वाहून गेले,
जाताना न बोलताच खूप काही सांगून गेले’’

त्या झाडाला आता पालवी फुटत होती -

‘‘मृग येण्या आधिच

झाडाला कोठून पालवी फुटली

वैशाखतही झाडाला जगण्याची

कोठून जिद्द आली?’’

असा प्रश्न मनात आला. झाडानेही आता पावसाचा मोह सोडला असावा अन् त्याच्यावर बांधलेल्या घरटयानेही पाखराचा. झाडाने आता त्याच्यावरच बांधलेल्या घरटयावर प्रेम केलं असावं म्हणून विरहातून मुक्त झाल्याने झाडाचा कृषपणा जाऊन ते बहरलं होतं. माझ्या प्रश्नाचं उत्तर मला मिळालं.



पाऊस म्हटलं की तो सहसा सर्वांनाच आवडतो. सहवासात घालवलेला पाऊस दोघांच्याही कायम स्मरणात असतो. पावसावर कविता करुन तो पावसामार्फत तिच्यावर शब्दात प्रेम व्यक्त करतो. तो तिला भेटण्यासाठी घराबाहेर पडलेला असतो पण आभाळ दाटून येतात आणि तिच्या येण्याच्या आशा मावळतात म्हणून हा 'गालीब' वरुणराजाला प्रार्थना करतो, 'की तिला आधी येऊ दे आणि ती आल्यावर मग मात्र तू एवढा बरस की तिचं घरी जाणं अवघड होईल'. प्रेमात तो एवढा वेडा होतो की, अवकाळी पडलेल्या पावसावरही मग तो प्रेमगीत लिहीतो, अन् कालांतराने तोच पाऊस त्याला आठवतो, ती सोबत नसते आणि असणार पण नाही म्हणून तो तिच्यासवे पावसालाही शिव्या हासडत बसतो. असा हा प्रेमातील पाऊस. जसा प्रेमातील पाऊस असतो तसा आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात सुध्दा पाऊस हा महत्त्वाचा असतो. आता हेच बघा ना! पाऊस पडत नाही म्हटलं तर शेतक-यांसकट सगळेच लोक आकाशाकडे नजरा खिळून त्याला बरसण्याची विनवणी करतात पण नेमका ऑफिसातून घरी जातानाच तो बरसला तर लोक त्यालाच शिव्या हासडतात.

पाऊस हा घरी आलेल्या पाहूण्यांसारखा काही दिवस योग्य प्रमाणात मुक्कामाला आला तर आपणही त्याचं स्वागत मोठया आनंदाने करतो पण तळ ठोकुन बसलेल्या पाहुण्यांप्रमाणे पावसानेही तळ ठोकला तर पाऊसही लोकांच्या नाकी नऊ आणतो. सुरुवातीला 'पाऊस मातीला सुगंध देऊन जातो, धरती मातेला हिरवा शालू नेसऊन जातो' अशा प्रकारचं प्रशस्तीपत्र आपण देऊन टाकतो पण हाच पाऊस जरा का जास्त बरसला तर पावसाने पुर आणला, सर्वत्र चिखल पसरला, डबके साचले त्यात मच्छरं झालीत, पावसाने रोगराई पसरवली अशे टोमणेही मारतो. असं हे पावसाचं आणि आपलं नातं कधी आपण त्याची आतुरतेने वाट बघतो तर कधी त्याला शिव्या घालायलाही मागे पुढे पाहत नाही. तरी पाऊस मात्र तटस्थपणे त्याचं काम करत असतो. पाऊस फक्त अन्न, धान्य, पिण्याला पाणीच देऊन जात नाही तर पाऊस कवीता सुद्धा देऊन जातो, फक्त त्याच्या पासून काय घ्यायचं हे आपलं आपणंच ठरवायचं असतं.

मालेटेकडीवरची एक आल्हाददायक मृगातली सायंकाळ. राजकमल, जयस्तंभ या मार्केटच्या बाजुने काळे ढग मालटेकडीकडे येत होते. मार्केट मधुन पिशव्या भरुन आणाव्या तसे हे ढग स्वत:त पाणी घेऊन येताहेत की काय असं वाटत होतं.

काळवंडलेलं आकाश आणि वातावरणाच्या आल्हाददायकतेचा फायदा घेत दोन लहाण मुलं गरमा गरम खारे दाणे खात वातावरणाचा आनंद लुटत होते. बघता बघता जोराचा पाऊस सुरु झाला, मुलांनी घाई घाईने दाणे संपवले आणि ज्या कागदात दाणे होते त्या कागदाची होडी तयार करुन त्यांनी ती पाण्याच्या प्रवाहात सोडली. या घटनेवर मी कविता करण्याचा बराच प्रयत्न केला पण जमतच नव्हतं पण मनातलं मनात सुद्धा साठवून ठेऊ शकत नव्हतो. मनाचा बांध फुटला आणि मनात दाटलेलं सारं मग शब्दात मांडलं-

मृग नक्षत्राच्या सरी बरसत होत्या, तो त्या मौसमातला पहिलाच पाऊस. बाहेर पाऊस पडत असताना बंद खोलीत अभ्यास करणा-या त्याच्या खिडकीतून पावसाचा एक थेंब त्याच्या हातावर आला आणि एका थेंबाने त्याच्या सा-या आठवणी ओल्या झाल्या. तो उठला, कपाटातून कवीतेची वही काढली आणि पावसावर लिहीलेल्या कविता चाळू लागला. काळया ढगातून बरसणा-या धारांप्रमाणे भुतकाळातील तिचा सहवास आठवणी बनुन वर्तमानावर बरसत होत्या, त्याच्या मनाने डोळयांशी चंग बांधला. आत त्याचं मन रडत होतं अन् बाहेर पाऊस धो-धो बरसत होता.

त्या वहीतील एका कवीतेनं त्याला चांगलंच छळलं, ते पान त्याने कर्रक्न फाडलं अन् त्याची होडी तयार केली, तिला पाण्याच्या प्रवाहात सोडली. नेमकी होडी तिच्याच दाराचा आडोसा घेऊन थांबली. अश्रूंना लपवण्यासाठी तो पावसात भिजायला आला होता. पहिला पाऊस म्हणून ती पण अंगणात भिजायला आली होती. दारा समोर अडकलेल्या होडीला कचरा समजुन ती पायाने होडीला वाट मोकळी करुण देणार तेवढयातंच तिला त्यावर काहीतरी लिहीलेलं दिसलं, तिने लाथ मागे घेतली, होडी उचलली, घडी उकलली आणि वाचू लागली. वाचता वाचता आता चक्क तिनेच रडायला सुरुवात केली. तो हे सारं बघंत उभा होता. त्याचे अश्रृ पावसाने लपवले होते. पाऊस आता थांबला होता, सारं शांत झालं, तिच्या मनात गर्दी केलेल्या ढगांनी मात्र आता बांध फोडला होता. तो शांत चित्ताने तिच्याकडे बघत होता ती मात्र माय हरवलेल्या वासरासारखी रडत होती. तिचे अश्रृ लपवायला आता पाऊसही तिच्या सोबत नव्हता. तिच्या रडण्याला कारणही तसंच होतं. ती त्याला सोडून गेल्यावर त्याला तिच्या सहवासात घालवलेल्या पाहिल्या पावसाने खुपचं छळलं होतं त्यावरच केलेली, तिच्या पासून लपवून ठेवलेली ती तिच्यावरचीच कवीता वाचत होती.

मालटेकडीवर फिरताना एका इसमाने एका मुलाला 'चवन्नी' म्हणुन चिडवलं. थोडा वेळ मनात त्या इसमाविषयी राग आला, ''हा इसम दुस-यांना चवन्नी म्हणतो हा तरी बंदा रुपया आहे का?'' अशा विचारांच्या वादळांशी खेळताना जुन्या चवन्नी विषयीचे किस्से मनात येऊन गेले.

चवन्नी म्हणजे पंचवीस पैसे. पैशाची तुलना करताना पंचवीस पैसे म्हणजे शुल्लक समजना-या लोकांनीच इतरांना कमी लेखण्यासाठी तर ही उपमा तयार केली नसेल? पैशांच्या चलनात तेव्हा पाच पैसे, दहा पैसे, वीस पैसै सुद्धा होते मात्र कोणाला कमी लेखण्यासाठी लोक 'चवन्नी'च का म्हणायचे याचा उलगडा अजूनही झालेला नाही. बहुतेक पंचवीस पैशाचं नाणं या बाबतीत नशीबवान ठरलं असावं म्हणून पैचवीस पैशाच्या नाण्याला हे भाग्य लाभलं असेल.

लहाणपणी दहा रुपयांच्या नोटेला जेवढं महत्त्व नव्हतं त्यापेक्षा कितीतरी जास्त महत्त्व आमच्यासाठी पंचवीस पैशाला होतं, कारण दहाची नोट कधी दिसायचीच नाही, बरं दिसली जरी तरी त्या नोटीला दुकानात जाऊन खर्चायची हिम्मत होत नव्हती. घरी आलेल्या पाहुण्यांनी खाऊसाठी हातावर पंचवीस पैसे ठेवले तर दोन रात्र झोप येणार नाही एवढा आनंद व्हायचा. कधी पंचवीस पैसे मिळालेच तर आमच्या पुढे प्रश्न असायचा, की ते पैसे कसे खर्च करायचे? किती पैशाच्या किती आणि कोणत्या गोळया घ्यायच्या? खरं तर पंचवीस पैसे खर्च करण्याची हिम्मतच होत नव्हती. जर पंचवीस पैसे मिळालेच तर एक दिवस त्याला न्याहाळण्यात आणि या पैशात काय काय विकत घ्यावं या प्रश्नात निघुन जायचा. दुस-या दिवशी दुकानात पंचवीस पैसे घेऊन जाताना एवढा आनंद व्हायचा जणू काही त्या पंचवीस पैशात आपण जगातले सारे सुख: विकत घ्यायला चाललोय! खिशात पंचवीस पैसे असायचे मात्र पंचवीस वेळा खिशात हात टाकून बघणं होत होतं, आहेत ना पैसे खिशात, पडले तर नाही ना? तर कधी मनात यायचं हे पैसे हरवले तर? मग मात्र खिशातच मुठ्ठी बंद करुन पैसे पकडायचो आता निश्चींती असायची कारण पैसे पडले तरी ते खिशातच पडतील, नुकसान होणार नाही. दुकानात गेल्यावर समोर ठेवलेल्या काचेच्या बरण्यांकडे असं बघायचो जसं पोलीसवाले एखादं निरीक्षण करण्यासाठी बघतात. दुकानात गेल्यावर परत तोच प्रश्न असायचा की कोणत्या अन् किती गोळया घ्यायच्या, मग मनातली सौद्याची यादी दुकानदाराला सांगायचो आणि -

१० पैशाच्या १० खोब्र्याच्या गोळया

५ पैशाच्या ५ व्हिक्सच्या गोळया

५ पैशाच्या ५ पान परागच्या गोळया अन्

५ पैशाची १ मोठी संत्रा गोळी

एका चवन्नीत अशा २१ गोळया यायच्या ! याच गोळया कधी खिशात तर कधी घामेजलेल्या हातात ठेऊन दिवसभर पुरायच्या. तेव्हाच्या पंचवीस पैशाच्या गोळयांच महत्त्व आजच्या पन्नास शंभर रुपयांच्या पिझ्झाला येणे शक्य नाही. लहान मुलांना हिनवण्यासाठी चवन्नी म्हनणारे लोकसुद्धा समजात होते पण तिच चवन्नी दिवस भराचा आनंद देऊन जायची.

गल्लीत कधी कोणी कटल्यात काही किराणा किंवा गव्हाची पोती आणली तर सारी पोरं चढावावर कटला ढकलू लागायचे, हेतू हाच होता की तो कटलेवाला जाताना रस्त्यापर्यंत आपला डावडाव करेल. घरी कोणी दुकानातून काही वस्तु आणायला सांगीतल्या तर घरी आल्यावर हातावर पंचवीस पैसे मिळायचे. एक दिवस असेच पंचवीस पैसे मिळाले बराच वेळ ते जवळ होते. गल्लीत एक कटला शिरला, त्याला ढकलू लागलो. जाताना डावडाव करण्यासाठी कटल्यात बसलो, रस्त्यापर्यंत डावडाव केला, घरी परत जाताना खिशात हात टाकतो तर काय पंचवीस पैसे गायब ! छातीत धळधळ.... पैसे कोठे पडले असतील ते शोधायला घरापासून रस्त्यापर्यंत पंचवीस चकरा घातल्या पण पैसे काही मिळाले नाही. पंचवीस पैसे हरवले म्हणजे आता आपण दिवसभर खायला मिळणा-या गोळयांपासून मुकलो म्हणून दोन दिवस झोप लागली नव्हती.

एकदा घराशेजारी एक दारुची बॉटल सापडली ही बॉटल सुद्धा भंगारवाले पंचवीस पैशाला विकत घ्यायचे. सापडलेली बॉटल घराबाहेरच एका ठिकाणी लपवून ठेवली आणि रोज भंगारवाल्याची वाट बघायचो. एक दिवस दुपारी भंगारवाला आला अन् मनात आनंदाला उधान आलं, की चला आता पंचवीस पैसे मिळणार. चोरुन ती बॉटल काढली अन् भंगारवाल्याला दिली. पंचवीस पैसे मिळाले. तेव्हा मला पैसे तोंडात टाकयची सवस होती. बॉटल विकुन मिळालेले पैसे मी तोंडात खेळण्यासाठी टाकले. खेळता खेळता पैसे पोटात! सेफ डिपॉझीट मध्ये जमा! घरी माहीत पडलं की पोटात पैसे गेले, मग काय सकाळ दुपार संध्याकाळ केळीच केळी खायला मिळायची. त्यातही संडासला गेल्यावर पैसे पडले की नाही हे शोधण्याचे अनुभव तर न सांगीतलेलेच बरे. ज्यांना माहीत व्हायचं माझ्या पोटात पैसे गेले ते वेगवेगळे सल्ले दयाचे. कोणी म्हणायचे तेव्हाच जोरात पाठीवर भुक्की मारली असती तर पैसे बाहेर आले असते. वाटायचं असं सांगणा-यालाच आपण एक भुक्की ठेऊन दयावी. कोणी म्हणायचे केळी खाऊ घाला निघतात आपोआप. केळी म्हणजे काय विड्रॉल स्लीप आहे? पण भुक्की मारल्या पेक्षा केळीचा प्रकार जरा बरा होता. कोणी सल्ला दयायचे, ''ऑपरेशन करुन काढून टाका'' म्हणून माझ्या पोटाचा एक्स-रे सुद्धा काढला होता. पण ऑपरेशन ऐवजी केळीनेच काम केलं असं म्हणतात! विड्रॉल झालेली ती रक्कम मी बघीतली नाही पण तरी असं म्हणतात की, ते पंचवीस पैसे बाहेर पडले. पण याच चवन्नीने रोज सकाळी सगळयांना कामाला लावलं होतं सकाळीच नाही तर कधी अवकाळी पावसा सारखं मी 'आली' म्हटलं तरी माझ्या मागे कोणी ना कोणी असायचं.

नंतरच्या सात आठ वर्षात पंचवीस पैशाचं मूल्य मात्र कमी होत गेलं आणि चवन्नीचा तुटवडा भासू लागला. जर ४९ रु. ७५ पैशाचा किराणा झाला तर दुकानदार पंचवीस पैशाची एक चॉकलेट देऊन किराण्याची किंमत राऊंड फिगर करुन टाकायचे. नंतर पुढे पुढे तर पंचवीस पैसे सुटे नसले की दुकानदार सर्रासपणे आपल्या हातात पंचवीस पैसे किंमतीचे चॉकलेट ठेवायचे. अशा प्रकारे दुकानदारांनी पंचवीस पैशाच्या चॉकलेटलाच चलनात आणले. दुकानदार सुटे पैसे नाहीत म्हणून ग्राहकांना पंचवीस पैशांऐवजी चॉकलेट दयायचे पण एखादया ग्राहकाने पंचवीस पैशे नाहीत म्हणून त्याऐवजी चॉकलेट दिली तर ते दुकानदाराला मान्य नसे, त्यांना पंचवीस पैशाचंच नाणं हवं असायचं. पुढे याच समस्येमुळं की काय माहीत नाही पण भारत सरकारने हे पंचवीस पैशाच नाणंच चलनातून बंद केलं. हे नाणं जरी काळाच्या पडदयाआड गेलं असलं तरी या नाण्याचे किस्से किंवा 'चवन्नी'चे आपल्या मनातील अस्तीत्व अजुनही कायम आहे.

माणसांच्या अजब गजब सवई असतात. कोणाला चहा पिताना छानसं काही तरी सुचतं, कोणाच्या मनात दाढी करताना काही कल्पना येतात, तर कोणाला विडी सिगारेट पितांना ध्यान मग्न झाल्यावर काही तरी नवीन सुचत असतं. मालटेकडीवर बसल्यावर माझ्याही मनात बरंच काही येतं.

जून महिण्याचे शेवटचे दिवस. यंदा पावसाला लवकरच सुरुवात झाली. मालटेकडीने स्वत:वर नवी कोरी हिरवाई परिधान केली होती. दोन दिवस झाले पावसाने उघाड दिली तरी वातारणात गारवा खेळत होता. मालटेकडीवरुन छान वा-याची अन् माझ्या मनात कल्पनेची झुळूक वाहत होती.

अमरावतीहून पंढरपुरला पायी जाणारी दिंडी खालच्या रस्त्याने जाताना दिसली. दिंडी दिसेनाशी होईपर्यंत दिंडीकडे एकटक बघत होतो, वाटेवरुन वर आकाशाकडे बघताना अंबादेवीच्या मंदिराकडे नजर अडखडली. मनात विचार आला याच अंबामातेच्या मंदिरात रुख्मिणी आणि श्रीकृष्ण एकमेकांना भेटले इथेच त्यांचा विवाह झाला. हे वारकरी ज्या विठाईला भेटायला चालले तीला याच अंबामातेने आशिर्वाद दिला होता.

रुख्मिणी अमरावतीची कन्या, अमरावती तिचे माहेर. प्रत्येक विवाहितेला माहेरची ओढ असते, लडा लागलेला असतो, माहेरच्या प्रत्येक गोष्टीची आस असते. माहेरहून आलेल्या पाहुण्यात तर ती विवाहिता आपला भाऊच शोधत असते. माहेरहून आलेली एखादी गोष्ट जर त्या विवाहीतेला मिळत असेल तर तिच्या आनंदाला पारावरच नसतो. अमरावती म्हणजे विठ्ठलाच्या रुख्मिणीचं माहेर अठ्ठावीस युगांपूर्वी रुख्मिणी पंढरापुरास गेली तेव्हा पासून अमरावतीकरांनी आपल्या मुलीला म्हणजे रुख्मिणीला काही माहेरची भेट पाठवली असेल का? नसेलच पाठवली.

कुठल्यातरी गावाकडून पंढरपूराकडे निघालेली एक दिंडी मालटेकडीच्या खालच्या रस्त्याने पायी जाताना दिसली अन् मनात विचार आला की, आपण अमरावतीकरांनी जर आषाढी एकादशी निमीत्त याच दिंडीसोबत रुख्मिणीसाठी खणा नारळाची ओटी अन् साडी पाठवली तर रुख्मिणीला किती आनंद होईल! रुख्मिणीला रुख्मि, रुक्मरथ, रुक्मबाहू, रुक्मकेशी, आणि रुक्ममाळी असे पाच भाऊ होते. रुख्मिणी या भूतलावर देह रुपात असे पर्यंत या पाच भावंडांनी तिच्यावर प्रेम केलंच असेल, तिचे लाडही पुरवले असतील, काही धार्मिक विधी देखील

पार पाडले असतील पण हिच रुख्मिणी पंढरपूरात वसून जगद्माता झाली, आपण अमरावतीकर सुद्धा रुख्मिणीचे भाऊ असताना आपण आपल्या रुख्मिणीसाठी वर्षाकाठी तिच्या माहेरहून तिच्यासाठी एक साडी सुध्दापाठवू शकत नाही ही किती मोठी शोकांतीका आहे. कोणतीच मुलगी आपल्या माहेरी हक्काने काही मागत नाही, रुख्मिणीचाही तसा काही हट्ट नाही, पण माहेरच्याच मंडळींनी हे समजावं लागतं की, आपल्या मुलीला, आपल्या बहीणीला काय लागतं. आपण अमरावतीहून पंढरपूरला पायी जाणा-या दिंडी सोबत 'मानाची साडी' पाठवावी व तिच साडी आषाढी एकादशीच्या दिवशी रुख्मिणीला नेसवावी अशी प्रथा एखादी धार्मिक, राजकीय संघटना किंवा महानगरपालीका का सुरु करत नाही? का हे कोणाच्या मनात आतापर्यंत आलं नाही, अमरावतीकरांमध्ये आपल्या मुली बद्दल व तमाम महाराष्ट्राच्या माऊली बद्दल ऐवढी उदासिनता का?

आषाढी एकादशीच्या दिवशी आपल्या माहेरहून आलेली साडी नेसुन किती आनंद होईल तिला किती सुंदर रुप दिसेल रुख्मिणीचं 'माहेरची साडी' नेसल्यावर.



मालटेकडीवर आल्हाद दायक वातावरणचा आनंद घेत बसलो होतो. ते दिवस गणेशोत्सवाचे होते. गणपती बसून चार दिवस झाले असतील, शहरातल्या गणेशोत्सवाला चांगलीच रंगत चढली होती. मित्रांसोबत कालच शहरातले सारे गणपती मंडळ धुंडाळून काढले होते. आकर्षक देखावे, झगमगणारी लायटींग, संगीताच्या ठेक्यावर ताल धारणारे कारंजे, संगीताच्या तालावर थिरकणारे लेझर शो, दर्शनाला वेळ लागतो म्हणून रांगेत लावलेल्या भल्यामोठया स्क्रिन, सामाजिक जागृती करणारे व्ही.डी.ओ., स्लाईड शोचं प्रेझेंटेशन हे सारं अद्‌भूत होतं. आध्यात्माला तंत्रज्ञानाची चांगलीच झालर चढली होती. हे सारं बघत असतानाच आध्यात्मिक ‘कम’ तंत्रज्ञानाच्या सा-या देखाव्यांमुळे गत काळ विसरुन गणेशोत्सवाचा आनंद घेत होतो पण आज मालटेकडीवर बसलो असता डोक्यात जुन्या नव्याचा भेद आला.

काही वर्षांपूर्वी तंत्रज्ञान नव्हतं असं नाही पण आजच्या केबल, सेट टॉप बॉक्स, इंटरनेट, फेसबूक, व्हॉट्‌सॲप, डिझिटलायझेशनच्या काळासारखा पण तो काळ नव्हता. लोकांना आनंदाचा शोध घ्यावा लागत होता. आजच्या गणेशोत्सवाला आलेल्या रुपा सारंखं पूर्वीच्या गणेशोत्सवाला रुप नव्हतं. गणेशोत्सव मंडळात फार तर लिंबु चमचा, संगीत खूर्ची, मडकी फोड स्पर्धा, जादुचे प्रयोग, कव्वाल्या, भजन, एखादया व्यक्तीचे व्याख्यान अन् झालंच तर व्ही. सी. आर. वर चित्रपट दाखवणे आणि शेवटच्या दिवशी पेन वाटपाचा बक्षीस सोहळा. ‘एक लाडू फुटला, गणपतीबाप्पा उठला’ म्हटलं की झाली गणेशोत्सवाची सांगता. असा तो गणेशोत्सव असायचा. मात्र या सगळया गणेशोत्सवात व्ही. सी. आर. व रंगीत टी. व्ही. भाडयाने आणून चित्रपट पाहण्यात एक वेगळाच आनंद होता.

पूर्वी प्रत्येकाच्या घरी टी. व्ही. नव्हती. रामायण, महाभारत बघायला लोक अनोळखी लोकांच्याही घरात शिरत. शिरत कसले अनधीकृतपणे कब्जाच करत, अशा ‘कालखंडात’ गणेशोत्सवात व्ही. सी. आर. व रंगीत टी. व्ही. भाडयाने आणून चित्रपट पाहणे म्हणजे शेजारच्या चार दोन मोहल्ल्यांसाठी तर ती पर्वणीच असायची.

रात्री गणपतीपुढे चित्रपट दाखवण्याची तयारी दुपार पासुनच सुरु व्हायची. एक्सटेंशन बॉक्स लावणे, टी. व्ही. ची दिशा कोठे असावी, ती कोठे ठेवावी, टी. व्ही. चे तोंड कुणीकडे असावे यावर गहण चर्चा कार्यकर्त्यांत चालायची. सायंकाळी रिक्शात बसुन भाडयाचा व्ही. सी. आर. व रंगीत टी. व्ही. गल्लीत शिरला की सा-या गल्लीतले लोक असे जमायचे जणूकाही एखादया व्यक्तीला अंत्यविधीसाठी दवाखान्यातून घरी आणले जात आहे. सारे लोक व्ही. सी. आर. जोडणा-या व्यक्तीकडे असे बघत जणू नासातून एखादा वैज्ञानिकच आपल्या गल्लीत आला आहे अन् तो आज खूप मोठा आवीष्कार करुन दाखवणार आहे.


गल्लीत रिक्शातून टी. व्ही., व्ही. सी. आर. येताच लोक आपआपली जागा राखून ठेवण्याचा प्रयत्न करीत. टी. व्ही. ला व्ही. सी. आर. ची जोडणी होईपर्यंत उरले सुरले कार्यकर्ते लगबगीने गणपतीची रात्रीची आरती करुन घेत. आरती करताना लोकांच लक्ष गणपतीच्या आरतीपेक्षा टी. व्ही. व व्ही. सी. आर. कडेच जास्त असायचं. व्ही. सी. आर. च्या जोडणीला उशीर व्हायचा टी. व्ही. खर्रर्रर.... खर्रर्रर.... आवाज करायची. त्यात काही मंडळी 'अरे व्ही. सी. आर. आहे बाबा तो एवढया लवकर थोडीच लागतो' असं म्हणून व्ही. सी. आर. सुरु होई पर्यंत आपल्या महत्तम शंका जागेवर ठेवून लघुशंका करुन येत. म्हणजे व्ही. सी. आर. सुरु झाल्यावर मध्ये उगाच अडथडा नको कारण एकदा गेलेली जागा परत मिळायची गॅरंटी नसायची.

व्ही. सी. आर. सुरु झाला की लोक टाळया वाजवायचे. १० मिनिटांपूर्वी केलेल्या गणपतीच्या आरतीला जेवढा टाळयांचा आवाज नसायचा तेवढा टाळयांचा आवाज व्ही. सी. आर. सुरु झाल्यावर व्हायचा. एखादा सच्चा रसिक शिटी सुद्धा वाजवून टाकायचा. व्ही. सी. आर. सुरु झाल्यावर आधी कोणता पिच्चर लावायचा यावर थोडी चर्चा वजा शाब्दिक भांडणे व्हायची आणि अशातच व्ही. सी. आर. वाला 'दुध का कर्ज' लावून टाकायचा. कोणाला व्ही. सी. आर. चं ज्ञान नसल्याने व्ही. सी. आर. वाल्यालाच रात्रभर मंडपात रहावं लागत असे. भक्तांच्या डिमांड वर चित्रपटातील एखादा प्रसंग मागे घेणे, वरिष्ठ आणि स्त्रीयांच्या सुचनेवरुन चित्रपटातील एखादा प्रसंग पुढे नेणे ही त्याची महत्त्वाची 'डयूटी' असायची.

चित्रपट सुरु असताना मध्येच वेगवेगळया प्रकारचे हसण्याचे आवाज, टॉन्टींग, शिटी वाजवणे हे सारं विचीत्र असायचं. हिरोचा अपघात झाला आहे, तो ईस्पितळात शेवटच्या घटका मोजत आहे, हिरोईन देवापुढे बसून देवाची विनवणी करत आहे आणि तेवढयातच दिवा मालवतो अन् पटकन लोकांच्या तोंडून ''हुश्श...'' असा आवाज निघायचा. पण गणपतीपुढे लावलेल्या दिव्यावर कोणाचंच लक्ष नसायचं की तो विझला आहे की सुरु आहे.

चित्रपट सुरळीत चालू असतानाच व्ही. सी. आर. मध्ये एखादा तांत्रीक बिघाड आला की तोच आमच्यासाठी नैसर्गीक कामासाठी झालेला तांत्रीक 'इंटरव्हल' असायचा. लोक आपल्या ( लघु ) शंकांचं निरासरन करायला गल्लीत शिरायचे तेव्हा सुद्धा चित्रपटाच्याच चर्चा रंगायच्या. चित्रपट सगळे लोक सोबतच बघायचे तरी एकमेकांना सांगताना अशा प्रकारे सांगायचे, चर्चा करायचे की जणू त्यापैकी एकाने तो चित्रपट बघितला व दुस-याने बघितलाच नाही. 'चित्रपटात आता पुढे काय होईल, हिरो काय फायटींग खेळला' अशी चर्चा करायचे तर एखादा लघुशंका करताना सगळं भान विसरुन नुकत्याच बघितलेल्या चित्रपटाचं गीत गायचा.

पन्नास एक लोकांची गर्दी चित्रपट बघायला असायची. पुढे बसण्याचा मान गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांचा, नंतर गल्लीतले लोक खुर्च्या टाकून बसायचे तर दुस-या कॉलनीतले, गल्लीतले लोक उभे राहून किंवा जागा मिळेल तिथे बसून रात्रभर चित्रपट बघायचे. गणपती मंडळाला टुरींग टॉकिजचं रुप यायचं. पहिला 'दुध का कर्ज' हिंदी चित्रपट संपला की मग मराठी 'झपाटलेला' चित्रपट लागायचा. काही लोक चित्रपट बघतानाच डुलक्या मारायचे. काही सच्चे रसिक असायचे जे रात्रभर चित्रपट बघितल्यावरही चौथा चित्रपट लावा म्हणून सांगायचे, सांगायचे कसले भांडायचे, पण सकाळच्या उजेडात टी. व्ही. निट दिसणार नाही म्हणून बारा तासांच्या भाडयाच्या करारावर आणलेला टी. व्ही. आणि व्ही. सी. आर. वाला 'आता दुर्गोत्सवात भेटू' म्हणत निघून जायचा.  चित्रपटाच्या चर्चा मात्र अनेक दिवस गल्ली मोहल्ल्यात रंगायच्या अगदी त्या रंगीत टी. व्ही. सारख्या.



मालटेकडी आणि गुरुवार म्हटलं की एरवीपेक्षा चांगलीच गर्दी असते. आज गुरुवार, नेहमीपेक्षा चांगलीच गर्दी ! टेकडीवर चढलो तर दर्ग्याला लायटींगने छान सजवलं होतं. आजुबाजुला दुकानदार हार, फुलं, चादर, प्रसाद, फुगे, खेळणी, खाण्याचे पदार्थ यांचे छोटे छोटे दुकान थाटुन बसले होते. क्षणभर मनात शंका आली, ''आपण आज मालटेकडीवरच आलोत ना?'' मालटेकडीचं रुप एवढं सजलं होतं की जणु काही आज सारे मालटेकडीचा जन्मदिवसच साजरा करीत होते.

मालटेकडीवर सगळीकडे गर्दी, शिवाजी महाराजांच्या पुतळयाखाली छोटी छोटी मुस्लिम मुलं बेभान होऊन खेळत होती. त्या निरागस मुलांना खेळताना जेवढा आनंद होत नसेल त्यापेक्षा अधिक आनंद मला त्यांना बघताना होत होता. जणू शिवबाच आपल्या मावळयांबरोबर खेळताहेत असंच वाटत होतं. यात्रा-जत्रा म्हटली की तसाही मुलांच्या आनंदाला पारावार नसतो.

आपल्या नेहमीच्या जागेवर बसावं म्हटलं तर तेथे सुद्धा दुकानदार ठाण मांडून बसले होते. बसायला दुसरी जागा शोधाण्याचा प्रयत्न केला, शिवाजी महाराजांचा पुतळा ज्या दिशेने बघत आहे त्या दिशेने मी ही बघु शकत होतो अशी जागा मिळाली आणि बसलो एकदाचं. ज्या दिशेने मी तोंड करुन बसलो त्याच दिशेने अमरावती पासून साठ एक किलो मिटर अंतरावर बहिरम आहे. मालटेकडीवरच्या यात्रेमुळं बहिरमची यात्रा आठवली. महाराष्ट्रातली सर्वात जास्त काळ चालणारी यात्रा म्हणजे 'बहिरमबुवाची यात्रा'. मंदिरभर पसरलेली बहिरमबुवाची महाकाय मुर्ती, प्रचंड अशी पर्वत रांग, विशाल जत्रेचं स्वरुप, तोबा गर्दी अशी ही महायात्रा.

आम्ही अनेकदा आमच्या बाईका घेऊन बहिरमला जातो. ( बायका नव्हे तर इंग्रजी बाईक म्हणजेच गाडी या शब्दाचे अनेकवचन बाईका ) पूर्वी या यात्रेला लोकं बैलगाडी, छकडयाने जायचे आता अमरावतीहून परिवहन मंडळाचे लाल डब्बे 'यात्रा स्पेशल' नावाने सोडले जातात. आजकाल तर लोक भाडयाने गाडी करुन मटणावर ताव मारायला बहिरमच्या दिशेने प्रयाण करतात. पूर्वी मात्र बैलबंडीने प्रवास करायचे, अंगात स्वेटर, डोक्यावर मफलर गुंडाळून बंडीने यात्रेला जायचे. बैल आपल्याच घंटीच्या तालावर काळया कुट्ट अंधाराला चिरत पुढे जात. थंडी तुडवत अचलपूर-परतवाडयाहून अनेक हौशी रसिक बहिरमला सायकलने जायचे. बैलांच्या घंटीचा आवाज तमाशातल्या घुंगरांजवळ जाऊन थांबायचा. सायकल थंडी तुळवत जाताना लोक सायकलच्या घंटीचा टिर्रर्रिंग टिर्रर्रिंग.... आवाज करायचे आणि परतताना मात्र त्यांच्या मनात तमाशातील घुंगरु नाचायचे.

सातपुडयाच्या अगदी कुशीत एका टेकडीवर बहिरमबुवाचं मंदिर आहे. बहिरमची यात्रा हंडीच्या मटणासाठी, तमाशाच्या फडासाठी आणि शेतीच्या अवजारांसाठी प्रसिद्ध असलेली यात्रा. बंडी छकडयातून उतरलेले यात्रेकरु लगेच यात्रेची मजा लुटायला लागत. बंडीतून आलेल्या माणसांच्या थव्यातील काही पाखरं आधी मंदिरात जात, ते परत येईपर्यंत उरलेले

सवंगडी वाळलेल्या काळया, रानगौ-या जमा करत. वर मंदिरात गेलेले भक्त खाली मैदानात आले की मग त्यांची मसाला वाटायची आणि चुल मांडाची लगबग चालायची. मातीची हंडी चुलीवर ठेवून उरलेले भक्त मंदिरातून दर्शन घेऊन येत. अहोरात्र सगळीकडं चुलींचा धुरंच धुर असायचा थंडीच्या दिवसातही डोंगरात धुकं कमी आणि धुरंच जास्त असायचा. बहिरमबुवाच्या मंदिरावरुन खालच्या राहुटया आणि पेटत्या चुली गुलमोहराच्या झाडासारख्या दिसायच्या. थंडीपासून बचाव व्हावा म्हणून जत्रेकरु चुली जवळ बसून मटणाच्या हंडीवरच हात शेकत बसायचे.

बासरी विकणा-याच्या बासरीचे स्वर तर कधी बैलांच्या घंटीचा आवाज यायचा तर मध्येच वरुन मंदिराच्या घंटीचा तर दुस-याच क्षणी तमाशाच्या फडातून घुंगरांचा नाद आणि ढोलकीचा थाप ऐकू यायचा. हंडी भोवती बसलेले जत्रेकरु टप्प्या टप्प्याने हंडी सोडून तमाशाच्या फडातून चक्कर मारुन यायचे.

लोकांना रात्रीच्या वेळेचं भान नसायचं, तसं बंधनही नसायचं. यात्रा आणि मातीच्या चुली अहोरात्र चालायच्या. हंडीतलं मटन, रानगौरीतले रोडगे, चुलीवरच्या भाकरी, मुळा, मेथी, लिंबु, हिरव्या मिरचीचा ठेचा आणि हाताने फोडलेला कांदा जेवायला एवढंच असायचं मात्र या जेवणाची चव यात्रेकरुंच्या कायम चिभेवर असायची निदान पुढच्या यात्रेपर्यंत तरी असायचीच असायची.  मागच्या वर्षी मटन कोणी बनवलं होतं अन् भाजी कशी उतरली होती याची चर्चा तर हंडीवर मटन शिजवताना नक्कीच व्हायची.

मध्य प्रदेशाकडे जाणा-या रस्त्याच्या कडेला यात्रेकरु मटणांच्या हंडया आणि तमाशांचे फड तळ ठोकून असायचे. हॉटेलवाले असायचे, लहाण मोठे दुकानदार प्लॅस्टीकची खेळणी विकायचे, बहिरमच्या प्रसिद्ध रेवडयांची दुकाने असायची, शेतीची अवजारे, बैलांची झुल, तडव्यांची दुकानं असायची, जाते पाटेवाले असायचे, सायकलवर पुंग्या बास-या लटकवून विकणारे असायचे, टुरिंग टॉकिज, छोटीशी सर्कस, मौत का कुंआ आणि इतरही मनोरंजनाची माध्यमे असाची. फडात घुंगराचे नाद आणि फडाबाहेर यात्रेत बासरीचे स्वर असायचे. बासरीचे सुर रात्रं दिवस कानावर पडायचे अगदी चुलीवरच्या धुरा सारखे निरंतर. थंडीत बासरीचे सुर ऐकण्याची मजा काही औरच असते. बंडीच्या चाकांचा, बैलांच्या घंटींचा, मटणाच्या हंडीत फिरणा-या चमच्यांचा, मसाला तयार करताना होणारा पाटया वरवंटयाचा आवाज, बासरीचे स्वर, घुंगराचा ताल, ढोलकीचा थाप या तालासुरांच्या सोबतीला मातीच्या हंडीतलं मटन, भाकर, लिंबू, कांदा, मेथी, मुळयांची चव हे सारे स्वर आणि जेवणवळीच्या चवी म्हणजे बहिरमबुवाच्या यात्रेचं वैशीष्टय. यात्रेत फक्त तमाशे, बैलबंडया अन् मटणाच्या हंडयाच नसायच्या तर शेतीसाठी लागणारी अवजारं सुद्धा या यात्रेचं एक वैशिष्टय होतं आणि आजही ते कायम आहे.

सर्कस, मौत का कुंआ आणि इतरही मनोरंजनाची माध्यमे यात्रेत असायची पण बहिरमबुवाची यात्रा ही तमाशविना अपुरीच असायची. आज केवळ लोककला म्हणून तमाशाच्या फडाकडं बघीतल्या गेलं असतं तर फार बरं झालं असतं, असो... आजही बहिरमच्या यात्रेतून चुलींचा धुर कायम निघतो, तमाशा सोडला तर या यात्रेत फारसा बदल झालेला नाही. तंत्रज्ञानाच्या जगात थोडाफार बदल झाला असेल तर तो हाच की, पूर्वी बहिरमच्या यात्रेत शेतीसाठी लागणा-या अवजारांचाही बाजार भरायचा आता मात्र कृषी प्रदर्शनाचं आयोजन केलं जातं. पूर्वी आजसारखं तंत्रज्ञान नव्हतं पारंपारिक अवजारांनीच शेती केली जायची, तोच काळ बरा होता तेव्हा कृषी तंत्रज्ञान नव्हतं आणि शेतक-यांच्या आत्महत्याही नव्हत्या. आज मात्र कृषी तंत्रज्ञानाच्या जगात कृषी प्रदर्शनांची संख्या वाढली आणि सोबतच शेतक-यांच्या आत्महत्यांचीही.

मालटेकडीवरच्या आजच्या यात्रेमुळं मी आठवणीतल्या बहिरमच्या यात्रेतून प्रवास करुन आलो. राजकमल ते अंबागेट पर्यंत नऊ दिवस अंबादेवीची यात्रा असते या यात्रेने आता आधुनिक स्वरुप प्राप्त केलं आहे.  दीड एक महिण्यापेक्षा जास्त चालणा-या बहिरमच्या पारंपारिक यात्रेचा कधीच विट येत नाही मग या यात्रेत तुम्ही दर आठवडयाला जा की दरवर्षी. बहिरमची यात्रा फक्त एक दिड महिणा चालत असली तरी वर्षभर ती मनात बहरलेली असते मटनाच्या चवी सकट.

मालटेकडीवर हजारो रंगांचे स्वभाव त्यांचे वागणे सहज बघायला मिळतात अगदी मालटेकडीवर उगवणा-या फुलांप्रमाणे आणि त्यावर फिरणा-या फुलपाखरांप्रमाणे भिन्न भिन्न. मनुष्याच्या वागण्या बोलण्याचा, त्याच्या स्वभावाचा अभ्यास करणे हा खरं तर मानसशास्त्राच्या अभ्यासाचा विषय, पण तरी लोकांच्या वागण्या बोलण्यावरुन त्यांचा स्वभाव आपल्या सहज लक्षात येतो.

मालटेडीवर माझं जास्त लक्ष कोणाकडे जात असेल तर ते सेवानिवृत्त कर्मचा-यांकडे. पांढरे कपडे घातलेले व कपडयांप्रमाणेच पांढरे केस झालेले हे निवृत्त कर्मचारी मालटेकडीवर एका सरळ रेषेत बसतात. सगळेच चर्चेत रंगतात त्यांचा स्वभाव धिरगंभीर व शांत दिसतो, सगळे एकमेकांशी हसत चर्चा करताना दिसतात. त्यांच्या स्वभावात, वागण्यात तापटपणा कधीच दिसत नाही.

मालटेकडीवर स्त्रीयाही मॉर्नीगवॉकला येतात. त्यांची सकाळच चर्चेतून होते. बहूदा त्यांच्या चर्चेचा विषय सासू सुनांचा असावा, लोक हा चुगल्या करण्यासारखा स्वभाव समजत असतील, त्यांनी खुशाल समजावं पण मी मात्र तसलं काही म्हणत नाही !

कालचीच गोष्ट, मालटेकडीवरुन खाली उतरलो, बघतो तर बस स्टॅंड रोडवर अपघात झालेला, लोकांची तोबा गर्दी. तमाशे बघणारे क्षणात जमा झाले, रक्तबंबाळ व्यक्तीला सारे बघत होते पण कोणीच त्या व्यक्तीच्या मदतीला धावत नव्हतं. आम्ही तिघांनी ऑटो केला, त्याला ऑटोत टाकलं, मी पण ऑटोत बसुन सोबत जाणार होतो पण ती दोन वयस्कर माणसं म्हणाली, ‘‘जास्त मार लागलेला नाही तेव्हा आम्हीच त्याला रुग्णालयात घेवून जातो.’’ ऑटो जिल्हा सामान्य रुग्णालयाकडे गेला आणि माझी जड पावले घराकडे वळली. त्याठिकाणी खारेदाने खात कित्येक आपलपोटे अपघाताची चर्चा करत होते. भिंतीवर हार परिधान करुन लटकत असलेल्या मृत व्यक्तीच्या फोटोत आणि अशा आपलपोटया स्वभावांच्या लोकात काहिच फरक नसतो. असे हे आपलपोटे लोक.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट. मालटेकडीवर काही जुने मित्र भेटले म्हणून चहा घ्यायला राजकमल चौकात गेलो. चहा प्यायला चर्चा वजा जाता तीन ते चार मिनीटे लागतात मात्र आमच्यातल्या एक मित्राने तब्बल दहा मिनिटे ओठांना चहाचा कप लावला. आधी वाटलं याला गार चहा पिण्याची सवय असेल. चहापाण्याचा त्याचा हा कार्यक्रम तब्बल दहा ते बारा मिनीटे चालला. चर्चेअंती आमची त्या कॅन्टीन वरुन निरोपाची वेळ झाली तेव्हा त्याने आपल्या

हातातला कप खाली ठेवला. हा प्रकार पहिल्यांदाच घडलेला नव्हता, हा असा चहा का पितो? हा प्रश्न सारखा सारखा माझ्या डोक्यात घोंगावत होता. दुस-या दिवशी मी त्याला विचारलं की तुला चहा प्यायला एवढा वेळ का लागतो? तर पठ्ठयाचं उत्तर बघा, ''अरे जर आपण लवकर चहा पिलो तर आपल्यालाच पैसे दयावे लागतील कारण बरेच लोक चहा पिल्याबरोबर पैसे दयायला खिशात हात घालतात, आपला चहा पिणे झाला तरी आपण निदान चहाचा कप हातातच ठेवावा म्हणजे तोपर्यंत आपल्या सोबतचा मित्र चहाचे पैसे देऊन मोकळा होतो.'' त्यांचा समज असतो की, आपण लवकर चहा पिलो तर चहाचे पैसे देण्यासाठी आपल्यालाच आधी खिशात हात घालावा लागेल. आता हया स्वभावाला कंजुस म्हणावं की वागण्यातली हुशारी?

एखादया ऑफिसमध्ये नवीन नियुक्त झालेल्या यादीतील कर्मचारी पहिल्या दिवशी कामावर रुजू होतो तेव्हा त्या कार्यालयातील ईतर कर्मचा-यांना वाटतं की आपणंच त्या कार्यालयाचे 'बॉस' आहोत.

काही लोक भांग करुन कंगवा खिशात ठेवतात सुद्धा पण गाडी चालवतांना त्यांना अचानक आठवतं, 'भांग करताना आपण कंगवा डोक्यावरच तर नाही ठेवला ना?' गाडी चालवताना मग ते डोक्यावर हात फिरवून खात्री करुन घेतात डोक्यावर कंगवा तर नाही ना. हे अगदी तसंच आहे जसं लॉक लावून घरा बाहेर पडल्यावर आठवावं, आपण लॉक तर लावला होता ना? काही लोक अनेक वेळा, सतत पॅन्टच्या झिपला हात लावतात बहूतेक हेच बघायला की झिप लावली आहे की नाही.

लोकांच्या स्वभावाचं निरीक्षण करायचं असेल तर ज्या ठिकाणी साप निघाला त्या ठिकाणी नुसतं जाऊन उभे रहा, एखादया स्लाईडशो प्रमाणे लोकांचे स्वभाव आपोआप तुमच्या समोर येतील. ''आमचा बाल्या आंघोळच करुन राहयला होता माय, असा आंगावर पाणी घेतेच तं दिसला ना माय मले, म्हनशीन तं हया जाळाच्या जाळा, हया फना काढून उभा होता, माया बाल्याच्या निरा डोयात डोये टाकून उभा होता.'' हया बाईच्या वाक्यात कुठेच 'साप' या शब्दाचा उल्लेख नाही मात्र तीने केलेलं वर्णन हे साप निघाल्याचं वर्णन आहे हे आपल्याला तिच्या घाबरत बोलण्या वरुन लक्षत येतं. साप निघालेल्या प्रसंगातील असा हा पहिला स्वभाव.

मुलं हातात काठया घेऊन यायचे तर मागून एखादया बाईचा आवाज यायचा, ''तू दुर होय रे पिंटया आपल्या घरी शेकबुवा हाय, आपल्याले नाई मारु येत.'' आदरयुक्त भिती असलेला हा दुसरा स्वभाव.

बरं साप निघाल्याचं ज्याने बघीतलं नाही तो सुद्धा त्या पहिल्या स्त्रीच्या कथनावरुन सांगतो की साप कोणत्या जातीचा आहे विषारी आहे की बिनविषारी. ज्ञान नसतानाही हुशारक्या मारणारा हा तिसरा स्वभाव.

एखादी बाई मधेच येते आणि म्हणते, ''बाल्याची आई, अहो वैनी कापूर गिपूर एखादी अगरबत्ती लावून टाका अन् एखादी कढय मढय कबुल करा अन् जाय म्हणा बावा आल्या पावली'' असा हा शांती प्रिय चौथा स्वभाव.

साप दिसत नाही म्हणून बाजुची एखादी बाई आपल्या मुलाला आवाज मारते, ''ओ ईजू, ओ ईजू रे, अवो ईजूचे बाबा त्या मोरी जवळ चिंध्या पेटवा बरं, आपल्या मोरी जवळ, मोरीच्या ओलाव्या ओलाव्यानं ईन गीन थो आपल्या घरात'' असा हा सतर्क असलेला पाचवा स्वभाव.

साप पकडो मोहीमेवर असलेल्या चार दोन पोरांकडे सा-या लोकांचं लक्ष असतं, हा कुतूहलयुक्त सहावा स्वभाव. साप पकडून त्याला बाहेर नेऊन फेकेपर्यंत हे चौघे स्वत:ला गुप्तचर यंत्रणेचे अधीकारीच समजतात. सापाचा हा खेळ चालेपर्यंत त्यांच्या कॉलर टाईट व माना वर असतात. त्या चौघांपैकी एकानेही यापूर्वी कधीही जिवंत साप पकडलेला नसतो, साप पकडण्याचा त्यांना अनुभवही नसतो तरी काही वेळेपूरतं त्यांना असं वाटतं की आपण साप पकडण्यात फार पटाईत आहोत आणि साप पकडण्यात आपला कोणी हातही पकडू शकत नाही. सगळं शांत असताना लगेच मागून आवाज येतो, ''अवो वैनी, थो पा ना कसा पाहून राहला, तिथंच हाय थो, म्या तं पैलेच म्हटलं होतं थो तिथंच असन'' वास्तविक त्या स्त्रीने तो साप कोठे आहे हे पूर्वी सांगीतलेलं नसतं तरी ती म्हणते की, तो साप तिथेच आहे हे तिने पूर्वी सांगीतलं होतं. जसा काही हा साप तिला सांगूनच तिथे जाऊन बसला होता. सर्रास खोटं बोलण्याचा हा सातवा प्रकारही आपल्याला साप निघालेल्या गल्लीत बघायला मिळतो.

लहाण सहाण पोरं हा सारा खेळ बघत असतात. एखादा मुलगा हळूच दुस-या मुलाच्या मागे जातो, लपून त्या मुलाच्या पायाला बोटांचा स्पर्श करतो अन् दुसरा मुलगा ''आई वं..'' म्हणत दचकून उठतो, असा हा आठवा व नववा खोडसर व घाबरट स्वभाव एकत्र दिसतो. त्यातंच त्या मुलाची आई घाबरुन पण रागाने ओरडते, ''थांबनं बे पोट्टया, सरप पाहून माया जीवाची पयलेच लाईलाई झाली अन् तुले मजाक सुचते'' असा हा स्वभावाचा दहावा प्रकार.

अर्ध्या एक तासाच्या महानाटयानंतर सापाला निर्लज्जपणे मारल्या जातं. ते चार लाठीमार कार्यकर्ते सापाला दूर फेकून येतात. सापाला फेकून येत असाताना जमलेले लोक त्यांच्या कडे बघत असतात तेव्हा त्या चौघांनाही असं वाटतं जणू ते रणांगणावरुन एखादी लढाईच जिंकून येत आहेत. त्यातच एक अविश्वासू ( प्रकार अकरावा ) स्वभावाची बाई म्हणते, ''अरे रामु, दूर फेकला ना बावा सरप, नाई त् ईन रातच्याले नागीन वासा वासानं?'' साप निघालेल्या गल्लीत लोकांचे असे पंचरंगी स्वभाव बघायला मिळतात.

लग्न झाल्यावर जेव्हा पहिल्या अखाडीला मुलगी आपल्या माहेरी येते तेव्हा नवरीच्या भावांना वाटतं की, आपली ताई जीवनात पहिल्यांदाच आपल्या घरी येत आहे. मुलीला सारं काही माहीत असतं तरी तिचे भाऊ नवरीला माहित असलेल्या त्याच त्या गोष्टी अशा फुगवून सांगतो जणू काही ती नवरी जीवणात आज पहिल्यांदाच त्यांच्या घरी आलेली आहे. यात नवरीच्या आई वडीलांचा स्वभाव तर कमालीचाच नवलाईयुक्त व आदरभावाने ओतपोत भरलेला असतो. नव्या नवेल्या जावायाची जोतो सरबराई, हाजी हाजी करतो. नवरीच्या घरच्या मंडळीमध्ये हा स्वभाव नव्यानेच निर्माण झालेला असतो.

माझा एक मित्र सायंकाळी घराचे दार उघडे ठेऊन चांगली मच्छरं जमा होऊ दयायचा, मच्छरं जमा झाली की मग मॉर्टीन लिक्वीड लावायचा आणि दार बंद करायचा. या मित्राचा असा समज होता जर मॉर्टीन लिक्वीड सुरु ठेवले तर त्या लिक्वीडने एकाच वेळी एक आणि पन्नास मच्छरं सुद्धा मरतात मग एक मच्छर मारल्यापेक्षा पन्नास मारलेली बरी !

आजकाल घरात प्रत्येकांची आंघोळीची साबण ही वेग वेगळी असते, काही लोक असेही असतात की जे आंघोळ करण्यापूर्वी त्यांच्या स्वत:च्याच साबणीला आधी पाण्याने धुतात मगच ती साबण आंघोळीला वापरतात, जरी ती त्यांची स्वत:ची साबण असली तरी. घरातून बाहेर जाताना प्रत्येकच जन दाराला कुलूप लावतो, काही लोक कुलूप लावताना तीन-तीन, चार-चार वेळा त्याला ओढून बघतात आणि आपल्या कामावर निघुन जातात मात्र अर्ध्या एक तासाने त्यांना प्रश्न पडतो की, आपण कुलूप लावलं होतं का? ब-याच लोकांना असेच प्रश्न पडतात की, आपण घरातुन

बाहेर पडताना टयूब लाईट बंद केला होता का? फॅन बंद केला होता का? फ्रिज बंद केला होता ना? वास्तविकत: अशे लोक लाईट, फॅन, फ्रिज व्यवस्थित बंद करुनच निघतात मात्र त्यांच्या मनात कोणत्या शंकेचा किळा प्रवेशतो देव जाणे जे त्यांना असे प्रश्न सुचतात.

काही काही लोकांचे स्वभाव असे रागीट असतात की, त्यांच्याशी बोलण्यापूर्वीच आपल्याला विचार करावा लागतो की, आपण बोलल्यावर हा आपल्या अंगावर मारायला धाऊन तर नाही येणर ना !

चित्रपट बघणा-या अनेक प्रेक्षकांना तो चित्रपट जणू आपल्याच जीवनावर आधारीत आहे याचा भास होतो, त्या चित्रपटातल्या हिरोमध्ये तर लोक स्वत:लाच बघतात.

व्यक्ती तेवढेच स्वभाव, तेवढंच त्यांच व्यक्तीगणिक बदलत जाणारं वागणं असे हे लोकांचे स्वाभाव शेवटी कोणी तरी म्हणूनच गेलं ना ‘व्यक्ती तेवढया प्रवृत्ती..... ’



मालटेकडीवर बसलो की, चर्चेसाठी आपल्या पुढयात अनेक विषय आपसूकच येतात. दहावी अकरावीला असताना जेव्हा आम्ही मालटेकडीवर जायचो तेव्हा मालटेकडीवरुन दिसणा-या शहराचं विहंगम दृष्य आमच्यासाठी गौण होतं कारण ही दुनिया पैशामागे धावते आणि आपणही या रेस मध्ये भाग घेतला पाहिजे असा थोडा फार समज वयपरत्त्वे आमच्यात रुजत होता. आम्ही मालटेकडीवर बसलो की आमच्यात अर्थव्यवसस्थेच्या विचित्र चर्चा रंगायच्या, जसं आपल्या डोळयाने जेवढी घरं दिसतात त्या सगळया घरांतील जेवढे व्यक्ती नोकरीवर असतील त्या सगळया लोकांच्या पगाराची बेरीज ही आपली एका दिवसाची कमाई असावी. आपल्या घरातून बॅंकेच्या तिजोरी पर्यंत भुयार खोदावा आणि बॅंक लुटावी, मालटेकडीवरुन जेवढी घरे दिसतात तेवढया जागेचे मालक आपणच असावे असे नानावीध विचार आमच्या मनात यायचे. रोजच्या त्याच त्या चर्चांचा कंटाळा आला की असे निरर्थक विचार आमच्या त्याच त्या जगण्यात नवचैतन्य निर्माण करायचे.

खरं तर जागाचं अर्थशास्त्र हे आम्हाला तेव्हा कळलं नव्हतं म्हणून तेव्हा अशा विचारांना आमच्या चर्चेत फार महत्त्व असायचं. बॅंक लुटीसारखे विचार आमच्या मनात यायचे खरे पण केवळ मनात विचार येणं पाप नसतं आणि गुन्हाही नसतो. काळ बदलत गेला, दहावी अकरावीवाले आम्ही थोर विचारवंत आता स्नातक झालो होतो. मालटेकडीवर बसल्यावर आमच्या मनात कधी प्रेमाचा ओलावा पसरायचा तर कधी भारतातील व्यवस्थेविषयी, मराठीत सांगयचं झाल्यास 'सिस्टीम'विषयी आमच्या मनात वणवा पेटायचा. पैशावर बोलणारे, प्रेमाचे शब्द चोरुन ऐकणारे आम्ही आता भारतीय व्यवस्थेविषयी बोलते झालो होतो एवढा आमच्यात आता समजुतदारपणा आला होता. बोलताना कधी लोकांनाच दोष देत होतो ''भारतात खुप काही आहे, पण आपली सिस्टीमच बेकार आहे'' अशी सुरुवात झाली की, आम्ही या सिस्टीमचं सारं कुटूंब एक करायचो, मनात चिड यायची, दोन शिव्या नेत्यांना दोन लोकांना हाणून आम्ही आमचा आत्मा शांत करायचो. आमच्या चर्चेत रंगलेल्या गप्पा अशा असायच्या- ''बरं झालं भारतात इंग्रज आले आणि आपल्या व्यवस्थेत बदल घडऊन आणले, इंग्रजांनी अत्याचार केले पण काही इंग्रज चांगले होते, अनेक इंग्रज अधिका-यांनी भारतात सुधारणा घडवून आणल्या, कायदे तयार केले पण तरी आपण सुधरलो नाही, आपल्या देशात आजही उघडयावर संडास करणारे, घर आणि ऑफिसच्या भिंतीवर थुंकणारे, बिनढोकपणे गल्लीत मुतनारे, फुटपाथ सोडून रस्त्यांवरुन चालणारे, कोठेही कचरा टाकणारे लोक आहेत. नाले साफ नसतात, रस्ते उखडलेले असतात त्यांची डागडूजी नसते, रस्त्यांवर एवढी गिटट्‌ी जमलेली असते की तिला एकत्र केलं तर आपल्या घरांवर स्लॅब टाकता येईल. भारतातले रस्ते दुस-याच महिण्यात कसे काय उखडतात? विदर्भाच्याच विकासाचे प्रश्न का रखडतात? सरकारी योजना असते पण त्यांची अंमलबजावणी का होत नाही? शेतक-यांसाठी पॅकेज घोषीत होतं मग मध्येच कुठे तरी कसं काय हडप होतं? हप्ते, घोटाळे, भ्रष्टाचार...., सरकारी शाळा आणि सरकारी रुग्णालयांतच सोईंचा अभाव का असतो? सरकार करोडो रुपयांची योजना आखते पण तरी

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवर फाटक्या गोधळीवर झोपण्याची पाळी कशी काय येते? मृत्यूशी खेळून काळी पिवळीतून अवैध वाहतूक केली जाते पण मी म्हणतो लोकांनी अशा टंच्च भरलेल्या काळीपिवळीतून प्रवास करणंच टाळलं तर... काळी पिवळीवाले कितीही हप्ते देत असतील पण आपण जनतेनीच ठरवलं की, काळी पिवळीत बसायचंच नाही तर मग काळीपिवळीवाल्यांना कितीही हप्ते देऊ देत आपण त्यात बसलोच नाही तर त्यांना त्यांचे अवैध धंदे बंद करावेच लागतील. खुलेआम मास विक्री करता येत नाही तरी रस्त्याच्या कडेला बिनधास्त मटणाची दुकानं थाटली जातात अन् आपणही जातोच ना तिथे. नेत्यांचा घोटाळा उघडकीस आला तरी ते मोकाट फिरताना दिसतात फार तर त्यांच्यावर निलंबणाची कारवाही होते पण निलंबन म्हणजे शिक्षा होऊ शकते का? विजेच्या तारांवर काटे टाकून लोक वीज चोरी करतात, नोकरी आजकाल पैशानेच लागते, पेसै देऊन नोकरीवर लागणे हे वाईट तरी पण वीस लाख भरुन लेक्चरर झालेलं पुरतं कारण काम कमी आराम जास्त असतो असा विचार करणारे आपण कधीच सुधरणार नाही, जि. प. च्या शाळा पडक्या असतात तिकडे कोणी लक्ष घालत नाही, सरकारी रुग्णालयं पाहिली की असं वाटतं स्वर्गात जायचा रस्ता येथूनच जातो, लोक आपल्या मुलाला हगवण लागेपर्यंत खाऊ घालतात पण दारावर आलेल्या भुकेल्या भिक-याला मात्र हाकलून लावतात, भ्रष्टाचार म्हणाल तर विचारु नका, कामचोरपणा करुन फुकटचा पगार गिळणारे पण ‘काही’ असतात, कामचुकार लोक नोकरीचं टेंशन घेत नाही आणि त्यांचेच दिवस छान निघून जातात, त्यासाठी ‘‘हॉं जी, हॉं जी’’ करणारे पण ‘काही’ असतात, जातीचं घाणेरडं राजकारण खेळणारे, श्रध्देला तिरांजली देऊन अंधश्रध्देत वावरणारे लोक, पोष्टरबाजी करुन स्वत:ची ओळख निर्माण करणारे पण लोक असतात, ‘येथे जाहिरात लावू नये’ असा फलक लावला तरी बेधडकपणे जाहिराती चिपकवणारे शहराचं सौदर्य विद्रुप करणारे उरफाटे लोक असतात......’’

अशा अनेकानेक गंभिर प्रश्नांवर आमची चर्चा रंगायची, या प्रश्नांची कारणं, त्यांचे निराकरण सल्ले आम्ही एकमेकांना दयायचो एवढंच काय तर भविष्यावाणी सुध्दा वर्तवायचो की, ‘‘भविष्यात या समस्यांच्या विरोधात खुप मोठा उठाव होणार आहे, परत एकदा भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, शिवाजी महाराज जन्माला येणार आहेत पण फरक एवढाच की, हे परकियांशी लढले होते आणि नव्याने भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, शिवाजी महाराजां सारखे महापुरुष जन्माला आल्यावर त्यांना स्वकियांसोबतच लढा द्यावा लागणार आहे.

रात्रीचे नऊ वाजायला आले, पोटात कावळे ‘अन्नान्न’करता त्यांच्या अन्यायाचा विरुद्ध आवाज उठवत होते म्हूणन मी आणि माझा मित्र जिथल्या समस्या तिथेच ठेऊन दर्ग्याकडे बघत खाली उतरलो आणि मनात गाणं होतं, ‘‘देख तेरे संसार की हालत क्या होगई भगवान कितना बदल गया इंन्सान’’

त्यानंतर आम्ही कित्येकवेळा मालटेकडी चढलो उतरलो पण चर्चेतला उठाव अद्यापही झालेला नाही पण परिस्थिती अशीच राहीली तर भविष्यात असा उठाव होईलच यात तीळमात्र शंका नाही. भविष्यात काहीही होवो पण अशाच चर्चेसाठी मालटेकडी म्हणजे आमच्या वर्तमानातलं एक हक्काचं व्यासपीठ होतं.

मालटेकडीवर शांत चित्ताने बसलो की, भुतकाळाच्या माळेतून आठवणींची फुले अलगद निसटू लागतात. आज मालटेकडीवर ‘पाडवा पहाट’ कार्यक्रमाचं फ्लेक्स अर्थातच संगणकाच्या सहायाने छापलेलं पोस्टर बघीतलं आणि चित्रपटासाठी हाताने पोस्टर रंगवणा-या चित्रकारांची, कलाकारांची आठवण झाली.

पूर्वी पांढ-या धोतराच्या कापडावर मोर्चासाठी ‘हमारी मांगे पुरी करो’, उपोषणासाठी ‘अमुक टमुक यांचे आमरण उपोषण’, लग्न प्रसंगी ‘अमुक परीवारातर्फे आपले हार्दिक स्वागत’, गणेशोत्सव, शैक्षणिक सहलीसाठी हिरवा, निळा, लाल असे केवळ दोन तीन रंग वापरुन कापडी बॅनर तयार केले जायचे. आता या देशी धोतराच्या बॅनरची जागा विदेशी फ्लेक्सने घेतली.

जिल्हा परिषदेच्या १९ नंबरच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पार पाडून मी अंबापेठेतील मणीबाई गुजराथी हायस्कुलमध्ये प्रवेश घेतला. शाळेच्या बाजुला उजंबवाडी होती, तेथे चित्रपटाचे भले मोठे पोस्टर चित्रकार आपल्या हातांनी तयार करायचे. जणू ती एक कार्यशाळाच होती. फिल्म डिस्ट्रिब्युटरच्या व्यवसायात मुंबई नंतर अमरावतीचा नंबर लागायचा. आज प्रमाणे पूर्वीही चित्रपट शुक्रवारीच प्रदर्शीत व्हायचे मात्र हाताने पोस्टर तयार करण्याचे काम बुधवार गुरुवार पासून सुरु व्हायचे. आम्ही काही मित्र शाळेतून घरी जाताना नियमीत उजंबवाडीत जाऊन पोस्टरला आकार देताना बघायचो तेव्हा आम्हाला हा प्रश्न पडायचा की चित्रपट प्रदर्शीत होण्यापूर्वीच हे कलाकार त्या चित्रपटातील क्षण कसे बरे चित्रीत करत असतील? मग आम्हीच उत्तर शोधायचो की, चित्रकलेचे जोशी मास्तर जशी आपल्याला एखदी गोष्ट सांगतात व त्यावरुन आपण चित्र काढतो तशी चित्रपटांची गोष्ट या चित्रकारांना कोणी तरी सांगत असतील आणि त्याप्रमाणे हे चित्रकार पोस्टर तयार करत असतील.

चित्रपटातील कलाकार त्यांच्या कला कॅमेराबद्ध करुन आपआपली कामे संपवायचे मात्र पोस्टर तयार करणा-या कलाकारांनी आपल्या कलेचा आत्मा त्या पोस्टर मध्ये रंगांच्या माध्यमातून ओतल्यावरच तो चित्रपट अंतिम रुप घ्यायचा असं म्हणायला हरकत नाही. मालटेकडीवर सौंदर्याचा साज चढवताना निसर्गाने जेवढा आत्मा मालटेकडीवर ओतला असेल तेवढयाच आत्मीयतेने हे चित्रकार चित्रपटाच्या पोस्टरवर आपला आत्मा ओतत असतील म्हणूनच चित्रपटाचे पोस्टर बघताच चित्रपट कसा असेल याची कल्पना आपण आपसूक मनात करु लागतो. चित्रपटावर पोस्टर आणि पोस्टरवर चित्रपट अवलंबून असायचा, फरक एवढाच की चित्रपटातील कलाकार श्रीमंत आणि अमर झाले तर चित्रपटातील कलाकारांसाठी ‘रक्ताचं चित्र’ तयार करणा-या चित्रकारांचे चेहरे आज कुणाच्या आठवणीतही नाहीत. पोस्टर तयार करणारे चित्रकार हे पडदयामागचे खरे कलाकार होते, त्यांचे चेहरे आज पडदयाआड गेले असले तरी त्यांच्या कलेचा नमुना आजही कित्येकांच्या मनात चित्ररुपात साकारलेला आहे, गडत रंगात अगदी गडद....!

ब-याचदा मन अस्वस्थ झालं की शरीर आपसूक मालटेकडीवरच्या एकांताकडे आगेकुच करतं आणि विनाकारण भुतकाळात घिरक्या घेतं बसतं. आजकाल मार्केटमध्ये सगळं काही ‘रेडी मेड’ मिळतं हया वस्तू टिकल्या काय किंवा तुटल्या काय त्याचं आपल्याला काहीच सोयर सुतूक नसतं. आज हजार रुपयांचं खेळणं मार्केट मधून आणा आणि उद्या त्याला तुटू द्या बहुदा तुम्हा आम्हाला काही वाटणार नाही, पण गरीबीत दिवस जगत असलेली मुलं स्वत:ची खेळणी स्वत:च तयार करुन खेळतात ती खेळणी तुटल्यावर त्या मुलांना विचारा ‘तुटण्याचं’ दु:ख काय असतं. ब-याच लोकांच्या घरी अशीच एक वस्तु असते तिचा उपयोगही रोज केला जातो तरी तिच्यावर कोणाचंही फारसं लक्ष नसतं ती म्हणजे ‘उशी’. पूर्वी लहान मुलांचे जुने कपडे कोंबून उशी तयार केली जायची आणि बालपणाच्या आठवणी तीस तीस वर्षे त्या उशीत जपून ठेवल्या जायच्या. मार्केट मधून तुम्ही लाख रुपयांची उशी आणा शेवटी ती बाजारुच निघेल पण आईनं घरी तयार केलेल्या उशीची किंमत बाजारातल्या उशीपेक्षा लाखपट जास्त असते.

आज घरी तीस वर्षांपूर्वीची एक उशी फाडली, पाच सहा महिण्याचा असताना ज्या फाटक्या चड्डया, बनीयान, टी शर्ट म्हणजे तेव्हाची जर्शी, बांडीस घातल्या होत्या त्या सगळया त्या उशीतून निघत होत्या, ती उशी नव्हती जणू काही तो जादूचा पेटाराच होता माझ्यासाठी ज्यातून आवठवणींचे एक एक मोरपीस निघत होते. उशीत कोंबलेल्या हया सा-या वस्तुंचा थोडा कुबट वास येत असला तरी वारंवार त्या फाटक्या कपडयांचा गंध घेण्याचा मोह अनावर होत होता, कारण मी पाच सहा महिण्यांचा असतानाचं माझं बालपण मला आज आठवत नाही पण माझ्या बालपणीचे ते उशीतून बाहेर पडलेले फाटके कपडे माझ्या बालपणाची साक्ष देत होते, माझं हगणं- मुतनं, रेंगाळनं, टोंगळयावर चालणं, बसणं आणि पहिल्यांदा स्वत:च्या पायावर उभं राहणं हे सारं त्या फाटक्या कपडयांनी बघीतलं होतं, ते कपडे मला माझ्या बालपणाच्या अस्तीत्वाची आठवण करुन देत होते, तेव्हा त्या फाटलेल्या, थिगळ लावलेल्या कपडयांचा दुर्गंध कसा येणार? ते तर मला चंदनाच्या परिमलापेक्षाही सुगंधी आणि अनमोल भासत होते.

एकीकडं मनात आनंद होता की, आपण आज त्या वस्तुंना स्पर्श करतो आहो ज्या तीस वर्षांपूर्वी आपण आपल्या लहानपणी वापरल्या होत्या तर दुसरीकडं मन व्यथीत होत होतं की, आपण बालपणात फाटक्या, थिगळ लावलेल्या चड्डया घातल्या. आज तर मुलांसाठी डझन डझन भर चड्डया आणून ठेवल्या जातात, लहाण बाळाने चड्डीत संडास केली म्हणून ती चड्डी फेकून देणा-या काही आया आहेत अशाही बाया मी बघीतल्या. पण तेव्हा अशी काय परिस्थिती राहीली असेल की आपल्याला थिगळ लावलेल्या चड्डया घालाव्या लागल्या असतील? असो....

तरीच मी विचार करत होतो, की आपल्याला रोज एवढी शांत झोप का येते? त्याचं उत्तर आज मिळालं, आईने जपून आणि उशी रुपात सजवून ठेवलेला भुतकाळ आणि आठवणींचा ठेवा आपल्या डोक्याखाली होता म्हणूनच. वाटलं अजून जपूण ठेवाव्यात हया फाटक्या चड्डया, ही दहा ठिकाणी शिवलेली, थिगळ लावलेली कापडं उशीच्या खजीन्यात पुढच्या पिढीसाठी फक्त एवढयासाठीच की, मी बोललेली भाषा पुढच्या पिढीला समजणार नाही पण ही स्वत: फाटकी कापडं अस्तीत्त्वांच्या पुराव्यानिशी पुढच्या पिढीला समजुन सांगतील परिस्थिती काय असते? भुतकाळातल्या परिस्थितीवर माझा काहीच राग, आरोप, रोष नाही उलट आनंद याचा वाटतो की, तेव्हाही मी एवढा श्रीमंत होतो की, मी माझी गरीबी रोज माझ्या उशाशी घेऊन झोपायचो.

-लेखक- प्रवीण अं. धुमाळे
; एम. ए., एल. एल. बी. द्ध
अमरावती

